www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक
# युवक आधार
मराठी

संपादक - संतोष शिवदास आमले
मुख्य संपादक - भारती आमले   उपसंपादक - श्री विलास गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश पाटील   सह संपादक - श्री मुकुंद कांबळे   महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3   अंक : ७१   बुधवार, १९ नोव्हेंबर २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ८   RNI MAHMAR/2023/89514




# बिबट्याचे मानवावरील हल्ले 'राज्य आपत्ती' ठरविण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणावा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- बिबट्यांना शेड्यूल एक मधून बाहेर काढण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश
- पुणे जिल्ह्यात दोन बचाव केंद्रे सुरू करा
- गाव/शहराजवळील फिरणाऱ्या बिबटे पकडण्यासाठी ड्रोनचा वापर करा
- नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करा
- बिबट्यांचा वावर असलेल्या भागात
- पोलीस व वन विभागाने गस्त वाढवावी
- रेस्क्यू टीम व वाहनांची संख्या वाढवावी



**मुंबई :** राज्यात बिबट्यांकडून वाढत चाललेल्या मानवांवरील हल्ल्यांची समस्या राज्य आपत्ती म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव पुढील मंत्रिमंडळ बैठकीत मांडावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. बिबट्यांना वन्यजीव संरक्षण अधिनियमाच्या शेड्यूल-1 मधून वगळून शेड्यूल-2 मध्ये समाविष्ट करण्याचा प्रस्तावही तयार करून सादर करावा. मानवांवर हल्ले करणाऱ्या बिबट्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक ठिकाणी तातडीने पिंजरे बसवावेत. यासोबतच, पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या उपचार आणि पुनर्वसनासाठी दोन रेस्क्यू सेंटर पुढील दोन ते तीन महिन्यांत सुरू करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागांना दिले.



राज्यातील बिबट्यांच्या प्रश्नांसंदर्भात मंत्रालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, आमदार शरद सोनवणे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, मुख्य सचिव राजेश कुमार, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख) एम श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्य जीव) श्रीनिवास रेड्डी, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात बिबट्यांचे हल्ले वाढले आहेत. त्यांना आळा घालण्यासाठी कालबद्ध पद्धतीने तातडीचे आणि दीर्घकालीन अशा दोन प्रकारे उपाययोजना करण्यात याव्यात. तातडीच्या उपायांमध्ये गावे व शहरांजवळील बिबट्यांना शोधून पकडण्यात यावेत. यासाठी ड्रोनची मदत घ्यावी. पिंजरे, वाहने, मनुष्यबळ आदी बिबटे पकडण्यासाठी आवश्यक साहित्यासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून द्यावेत. तसेच दीर्घकालीन उपाययोजनेत बिबट्यांची नसबंदी करण्यात यावी. तसेच पकडलेल्या नरभक्षक बिबट्यांना ठेवण्यासाठी पुणे जिल्ह्यात दोन रेस्क्यू सेंटर उभारण्यासाठी तातडीने जागा शोधून आराखडे तयार करावेत. तसेच गोरेवाडा सह इतर ठिकाणी सध्या असलेल्या रेस्क्यू सेंटरची क्षमता वाढविण्यात यावी.बिबट्यांचा समावेश शेड्यूल एक मध्ये आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्यांना पकडणे, त्यांना मारणे यावर मर्यादा येतात. त्यामुळे बिबट्यांना शेड्यूल एकमधून काढण्यासंबंधी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी केंद्र शासनाकडून मिळाली आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्यांना शोधून नसबंदी करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील, दौंडचे आमदार राहूल कुल, कोपरगावचे आमदार आशुतोष काळे, श्रीरामनगरचे आमदार लहू कानडे त्यांच्या भागातील समस्या सांगून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

### बचाव केंद्रांची क्षमता तातडीने वाढवावी - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी बिबट्यांची समस्या वाढल्यामुळे लोकांमध्ये रोष निर्माण झाल्याचे सांगितले. यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी गाव व शहराजवळ फिरणाऱ्या बिबट्यांना ड्रोनच्या सहाय्याने शोधून त्यांना पकडण्यात यावे. त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ तातडीने वाढविण्यात यावे. नागरी वस्तीत बिबटे आल्यास तो नरभक्षक समजूनच त्याला पकडण्यात यावे. बिबट्यांचा वावर असलेल्या भागात रेस्क्यू टीम व वाहनांची संख्याही वाढवावी. सध्या असलेल्या माणिकडोह व इतर ठिकाणच्या रेस्क्यू सेंटरची क्षमता वाढवावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

### बिबट्यांचा वावर असलेल्या ठिकाणच्या शाळांची वेळ बदला – उपमुख्यमंत्री अजित पवार

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, बिबट्यांच्या हल्ल्यामुळे अनेक ठिकाणी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांमधील भीती कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविण्यात याव्यात. बिबट्यांचा वावर असलेल्या ठिकाणी पोलीस व वन विभागाने गस्त वाढवावी. तसेच बिबट्यांचा वावर असलेल्या पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील भागांमध्ये शाळांची वेळ सकाळी 9.30 ते 4.00 अशी करण्यात यावी. रेस्क्यू सेंटर उभारण्यासाठी तातडीने निधीचा प्रस्ताव देण्यात यावा.

### जंगलात भक्ष्य मिळण्यासाठी उपाययोजना करा – वन मंत्री गणेश नाईक

जंगलामधील भक्ष्य कमी झाल्यामुळे बिबटे हे मानवी वस्तीत येऊन हल्ले करत आहेत. त्यामुळे जंगलामध्येच त्यांना भक्ष्य मिळण्यासाठी बिबट्यांची संख्या जास्त असलेल्या जंगलात शेळ्या सोडण्यात यावेत. जेणेकरून ते मानवी वस्तीत येणार नाहीत. तसेच बिबट्यांना पकडण्यासाठी पुणे जिल्ह्यात टप्प्याटप्प्याने 1200 पिंजरे पुरविण्यात येत आहेत, अशी माहिती वन मंत्री नाईक यांनी यावेळी दिली.

---

## आंतर–महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेला उत्साहपूर्ण सुरुवात

### ४२२ स्पर्धकांचा सहभाग । सीकेटी महाविद्यालयात १७ ते २२ नोव्हेंबरदरम्यान स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी महाविद्यालय आणि मुंबई विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर-महाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेला सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण सुरुवात झाली. २२ नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील तब्बल ४२२ स्पर्धक सहभागी झाले आहेत.



स्पर्धेचे उद्घाटन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी संचालक आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच मुंबई शहर झोन-१ चे उपाध्यक्ष डॉ. एस. के. पाटील यांनी उपस्थित खेळाडूंचे मार्गदर्शन केले. त्यांनी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देत उत्कृष्ट खेळभावना जपून स्पर्धा खेळण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाला मुंबई शहर झोन-१ सचिव डॉ. मनोज वर्मा, मुंबई शहर झोन-१ स्पर्धा सचिव डॉ. व्ही. बी. नाईक, मुंबई उपनगर सचिव डॉ. निलम पाटील तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या आयोजनाचे कौतुक करत स्पर्धेच्या माध्यमातून तरुणाईत खेळ संस्कृती अधिक भक्कम होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही. बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. भरत जितेकर, प्रा. प्रतिज्ञा पाटील यांच्यासह जिमखाना विभागातील सर्व सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत. स्पर्धेत विविध वयोगटातील आणि वजनगटातील सामने सलगपणे पार पडत असून खेळाडूंमध्ये मोठी उत्सुकता दिसून येत आहे.सीकेटी महाविद्यालयात दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये बॉक्सिंग स्पर्धा ही विशेष उत्साहाने पार पडणारी स्पर्धा असल्याचे आयोजकांनी सांगितले. स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ २२ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे.

---

## महात्मा फुले मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रशांत देशमुख यांची निवड, स्वागताध्यक्षपदी गौरव कोलते

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** अखिल भारतीय मराठी साहित्य संशोधन परिषद व जगतगुरु तुकोबाराय साहित्य परिषद आयोजित १८ वे राज्यस्तरीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलन खानवडी (ता. पुरंदर) येथे दि.२७ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील हातनोली (चौक) येथील प्रशांत देशमुख यांची तर स्वागताध्यक्ष पदी गौरव कोलते यांची निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संमेलनांचे मुख्य संयोजक व ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव यांनी दिली.



महात्मा फुले यांचे मूळ गाव असलेल्या कऱ्हा नदीच्या काठावरील खानवडी येथे दरवर्षी साहित्य संमेलनाचे आयोजन केले जाते. संमेलनात उद्घाटन समारंभ, कथाकथन, ग्रंथदिंडी, नाट्यप्रयोग, कविसंमेलन असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. संमेलनाला प्रमुख पाहूणे म्हणून प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते सूरज चव्हाण, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विजय कोलते, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ दिगंबर दुर्गाडे, भाजपचे नेते बाबाराजे जाधवराव, ज्येष्ठ साहित्यिक डॉ जयप्रकाश घुमटकर आदी उपस्थित राहणार आहेत.

संमेलनाध्यक्ष प्रशांत देशमुख हे शिव व्याख्याते असून त्यांनी शेकडो व्याख्यानातून समाजाचे प्रबोधन केले आहे. गुड मॉर्निंग, जय शिवराय या पुस्तकाचे लेखन त्यांनी केले आहे. गौरव कोलते हे गेली पंधरा वर्षे सामाजिक व राजकीय क्षेत्रात काम करीत असून आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानचे संचालक आहे . प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात ते काम करीत आहेत. ८७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या संयोजनात त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता.

---

## शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे यतीन देशमुख प्रभाग १६ मधून महाविकास आघाडीतून निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नवीन पनवेल शहर प्रमुख यतीन देशमुख प्रभाग १६ मधून महाविकास आघाडीतून निवडणूक लढवण्यासाठी इच्छूक असून ते निवडणुकीला उभे राहिल्यास महायुतीच्या प्रस्थापित नगरसेवकांना प्रभाग १६ मधून तगडे आवाहन उभे राहणार आहे.



यतीन देशमुख हे पनवेल महापालिकेच्या २०१७ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत सुद्धा उभे होते. मात्र त्यांचा निसटता पराभव झाला. तरी देखील यतीन देशमुख हे मागे हटले नाहीत. गेल्या ८ वर्षात त्यांनी आपला जनमानसात आधार वाढवला आहे. यतीन देशमुख वेगवेगळ्या मुद्द्यांवर विरोधकांना धारेवर धरत महाविकास आघाडीचा पर्याय जनतेसमोर घेऊन जात आहे. सत्ताधाऱ्यांनी आपली एकाधिकार शाहीमुळे विरोधकही त्यांच्यामागे गेले. मात्र यतीन देशमुख यांनी ठोसपणे विरोधकांची भूमिका निभावत महाविकास आघाडी द्वारे सत्ताधाऱ्यांची वेगवेगळ्या प्रश्न मांडून वेळप्रसंगी आंदोलन उभारून कोंडी केली. सध्या पनवेल महापालिकेत अपुरा पणी पुरवठा, खराब रस्ते, वाढीव मालमत्ता कर, वाहतुक कोंडी, पार्किंगसाठी अपुरी सुविधा, १५ वर्षांहून अधिक काळापासून प्रलंबित बस डेपोचे सुधारीकरण, झोपडपट्टी पुनर्वसन, फुटपाथ वरील अतिक्रमण, महापालिकेत जोडलेल्या गावांचे मूलभूत सुविधा, भ्रष्टाचार असे विविध प्रश्न आ वासून उभे आहेत. मात्र ठोस विरोधक नसल्यामुळे ते प्रश्न सुटत नाही.

तसेच राज्यात झालेल्या मराठा समाजाच्या आंदोलनात त्यांनी अग्रेसर राहून सहभाग नोंदवला.

त्यामुळे पनवेल महापालिकेच्या निवडणुकीसाठी यंदा यतीन देशमुख उभे राहिल्यास महायुतीला प्रभाग १६ मध्ये तगडे आवाहन उभे राहणार आहे.

---

## नशामुक्त भारत अभियानास मुंबई विभागात उस्फुर्त प्रतिसाद; ८९,००० हून अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी







**दैनिक युवक आधार**

**मुंबई / नवी मुंबई :** केंद्र सरकारच्या नशामुक्त भारत अभियानाच्या 5 व्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमास मुंबई विभागातील मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यातील सुमारे ८९,००० हून अधिक विद्यार्थी विद्यार्थिनी नशामुक्ती संदर्भात शपथ घेतली. अशी माहिती मा. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांनी दिली.

केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय नवी दिल्ली यांच्या वतीने भारताला मादक आमली पदार्थ मुक्त बनवण्याच्या दृष्टीकोणातून नशामुक्त भारत अभियानाची सुरवात दिनांक १५ ऑगस्ट, २०२० रोजी करण्यात आलेली होती. या उपक्रमाला 5 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल केंद्र सरकारचा मुख्य कार्यक्रम अमृतसर, पंजाब येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी मार्गदर्शन केले.

नशामुक्त भारत अभियानाच्या अनुषंगाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे दिनांक १८ नोव्हेबर, २०२५ रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय कार्यक्रम मा. बाळासाहेब सोळंकी, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली हेमू कलानी गर्ल्स कॉलेज, चेंबूर कॉलनी चेंबूर येथे संपन्न झाला. यावेळी उपस्थित विद्यार्थी – विद्यार्थिनींनी नशामुक्तीबाबत शपथ घेतली. नशाबंदी मंडळाचे सरचिटणीस श्री. अमोल मडामे यांनी नशामुक्तीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर / मुंबई शहर श्री. रविकिरण पाटील व हेमू कलानी गर्ल्स कॉलेजच्या सचिव श्रीम. रीटा वजराणी, संचालक श्री. शिवप्रसाद कुल्ची इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

मुंबई विभागातील सामाजिक न्याय विभागातर्फे मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यात सहायक आयुक्त, समाज कल्याण, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत संबधित जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहे, शाळा महाविद्यालये, अनुदानित वसतिगृहे, निवासी शाळा या ठिकाणी दिनांक १८ नोव्हेबर, २०२५ रोजी नशामुक्त अभियानाबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. या उपक्रमास सुमारे ८९,००० हून अधिक विद्यार्थी – विद्यार्थिनी सहभागी झालेले होते.

# सोयगाव वंचित बहुजन आघाडीच्या तालुका अध्यक्षपदी गणेश सोनवणे यांची निवड

## तरुण, सक्रिय व समाजनिष्ट नेतृत्वाला मिळाली जबाबदारी

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे :** वंचित बहुजन आघाडीच्या सोयगाव तालुक्यातील संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत दस्तापुर येथील गणेश सोनवणे यांची सोयगाव तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. वंचित बहुजन आघाडी सोयगाव पश्चिम तालुका कार्यकारिणी जिल्हा अध्यक्ष छ.संभाजीनगर रामेश्वर तायडे यांच्या आदेशाने व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही निवड जाहीर होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. ता.अध्यक्ष गणेश सोनवणे हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून स्थानिक पातळीवरील विविध प्रश्नांवर त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. त्यांच्या या मेहनतीची दखल



घेत त्यांना तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.व पुढील कार्यकारिणी घोषित करण्यात आले.ते पुढील प्रमाणे रविंद्र लुमान गरुड वाडी. सु, वडगाव जिजाभाऊ भिमराव शेजवळ, उपाध्यक्ष,शिदोंळ वाल्मिक आबा सोनवणे, महासचिव,हनमंतखेडा संदिप भगवान शिंदे,उपाध्यक्ष,बनोटी मिलींद ढीवरे,संघटन,नायगाव शिवाजी खोतकर,उपलखेडा आकाश शालीकराम,दस्तापुर माथ्थु तळवी जैस्वाल,हनुमंत खेडा नामदेव चोथमळ अशी जब्बो कार्यकारिणी घोषित करण्यात आली..या नवीन नियुक्तीमुळे सोयगाव तालुक्यात वंचित बहुजन आघाडीची संघटनरचना अधिक मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. कार्यकर्त्यांनी गणेश सोनवणे यांच्या निवडीचे संगपाल सोनवणे, सचिन शिंदे, वाल्मिक शैलके, विजय निकम,तुराब मामु यांनी स्वागत करत त्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

# टाळ मृदंगासह लेझीमच्या निनादात सेलूत अवतरली साहित्यपंढरी; ग्रंथदिंडीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** जिल्हास्तरीय पहिले अक्षर साहित्य संमेलनानिमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळा परिसरातून रविवारी सकाळी आठ वाजता निघालेल्या ग्रंथ दिंडीतील सहभागी शालेय विद्यार्थ्यांच्या पथकाने सादर केलेल्या हरिनामाच्या गजरासह ,टाळ मृदंग व लेझीमच्या निनादामुळे सेलूत साहित्य पंढरी अवतरल्याची अनुभूती आली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला सेलूकरांनी व साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला .ग्रंथ दिंडीच्या मार्गावर शहरातील महिला भगिनी व संयोजकांच्या वतीने कलाशिक्षक यांच्या पुढाकारातून सडा व रांगोळीने रस्ते सुशोभित करण्यात आले



होते. शहरातील मान्यवरांच्या वतीने ग्रंथ दिंडीच्या मार्गावर जागोजागी स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. वंदे मातरमला १५०वर्ष पूर्ण झाल्यामुळे नूतन विद्यालयाच्या वतीने भारतमाता तसेच केशवराज बाबासाहेब विद्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ प्रतिकात्मक सजीव देखावा ग्रंथ दिंडीच्या दर्शनी भागात सर्वांचे लक्ष वेधून घेत होता. के.बा. विद्यालय व नूतन कन्या प्रशालेतील विद्यार्थ्यांनी लेझीम पथक व न्यू हायस्कुलच्या चिमुकल्या नऊ वारी साडीतील विद्यार्थिनींनी डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन दिंडीत सहभाग नोंदविला. तसेच डासाळा येथील जिल्हापरिषद प्रशालेतील विद्यार्थ्यांनी दिंडीत सहभाग नोंदवून टाळ मृदंगाच्या तालावर हरिनामाचा गजर करत ग्रंथदिंडीची शोभा वाढवली.तसेच नऊ वारी साडीतील चिमुकल्या विद्यार्थिनींनी फुगडी खेळून ग्रंथदिंडीत भक्तिमय वातावरण निर्माण केले.ग्रंथ दिंडीत सहभागी प्रत्येकांच्या डोक्यावरील साहित्य संमेलनाचा नामोल्लेख असणारी टोपी लक्षवेधक ठरली.दिंडी मार्गावरील नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांचा भारतमाता व भक्त पुंडलिकाचा देखावा,न्यू हायस्कुलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला वारकरी दिंडी देखावा तसेच कै. राधाबाई किशनराव कान्हेकर शारदा विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेला संत जनाबाई ,बाहेती बिहाणी नूतन इंग्लिश स्कुलच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला संत ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद बोलविलेला देखावा आणि विवेकानंद प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेला वारकरी संतमेळा देखावा दिंडीतील सहभागी साहित्यिकांसह नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. एव्हढेच नव्हें तर दिंडीत सहभागी असणाऱ्या सर्वांना पालखी व देखाव्यांसमवेत छायाचित्र काढण्याचा मोह आवरता आला नाही.दिंडीतील पालखीत भारताचे संविधान, ज्ञानेश्वरी ग्रंथ व श्री.केशवराज बाबासाहेब महाराज यांचा चरित्रग्रंथ ठेवण्यात आला होता.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मार्गस्थ झालेल्या ग्रंथ दिंडीतील मान्यवरांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. ग्रंथ दिंडीचा समारोप कै. श्रीरामजी भांगडीया नगरीतील साई नाट्यगृह परिसरात करण्यात आला. व त्यानंतर साहित्य संमेलनाच्या उद्घाटन समारंभ करण्यात आला.

# स्व.माणिक पोदार लर्न स्कूल व पोदार जम्बो किड्स वाढोणा येथे वार्षिक क्रीडा दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी/रणजीत सिंह ठाकुर :** दि. 15 नोव्हेंबर 2025 रोजी स्व माणिक पोदार लर्न स्कूल वाढोणा येथे वार्षिक क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून दिपक मस्के पोलीस निरीक्षक,पोलीस स्टेशन सेनगाव शाळेच्या संचालक मंडळातून विनायकराव जाधव, ज्योती जाधव,सचिन मापारी, सीमा मापारी प्राचार्य हर्षल वासेवाल मुख्याध्यापिका नर्गिस अंजुम, शैक्षणिक समन्वयक अनुपराज सपकाळ क्रीडा शिक्षक अजय भालेराव उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले.

यानंतर मान्यवरांनी ओलंम्पिक टॉर्च देऊन मार्च पास्ट ला परवानगी देऊन कार्यक्रमाला सुरुवात केली. खेळ शालेय जीवनात अत्यंत महत्वाचे आहे. खेळाच्या नियमित



प्रयोगाने मनुष्यांना शारीरिक आणि मानसिक रूपात आरोग्य, तंदुरुस्ती, संतुलित विकास, सामरिक क्षमता, समुदायी सहभाग आणि नैतिकता ह्या प्रमुख महत्वाच्या लाभांची देखील शास्वती मिळते.

खेळ केवळ शारीरिक फायदे प्रदान करणारी नाही, तर त्याने मानसिक स्वास्थ्याचे प्रमाणात वाढवते. खेळाचे प्रयोग मनाच्या तणावाची क्षमता कमी करते, मनोदशा आणि चिंताप्रमाणे सुधारणे, तंदुरुस्ती व व्यायामप्रमाणे उत्तेजना देणे ह्या गोष्टींच्या सुधारणांसाठी मदत करते.

खेळाचे प्रयोग अभिनव कल्पनाशक्तीचा विकास करते, योग्य मूलभूत कौशल्य विकसित करते आणि स्वतंत्रपणाची भावना तळमळतेने खेळ हा केवळ आपल्या आरोग्यासाठीच नाही तर मानसिक आरोग्यासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे, यामुळे अनेक फायदे मिळतात. खेळाचे प्रयोग एकता, समावेश, न्याय, उत्साह, धैर्य आणि विनम्रता ह्या महत्वपूर्ण मानवी गुणांची स्थापना करते.

खेळाच्या प्रतिस्पर्धात्मक माहितीचा विकास होणे, न्यायाच्या मूलभूत सिद्धांतांची पालन करणे,संघर्ष करण्याची क्षमता विकसित करणे ह्या सर्व नैतिक मूल्यांच्या विकासाची सहाय्यता करते.संक्षेपणार्यात, शालेय जीवनात खेळाचे महत्व खूप मोठे आहे. त्याचा प्रयोग शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी, सामरिक क्षमतेच्या विकासासाठी, समुदायी सहभागासाठी आणि नैतिकतेसाठी उपयुक्त आहे. याच पार्श्वभूमीवर स्व.माणिक पोदार लर्न स्कूल व पोदार जम्बो किड्स वाढोणा च्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये शाळेचे प्राचार्य,मुख्याध्यपिका तसेच प्रमुख पाहुणे यांची समायोचित भाषणे संपन्न झाली. प्रत्येकाने आपल्या भाषणातून खेळाचे महत्व स्पष्ट तसेच सांस्कृतिक नृत्याचे आयोजन करण्यात आले होते.

ढोल पथकाने आपली कला सादर करून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविले कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार शाळेतील वर्ग 8 वी व 9 वी च्या विद्यार्थ्यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक,विद्यार्थी,शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# सरकारचे " शेतकरी " मासिक आत्महत्येच्या वाटेवर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे :** ए आय ( कृत्रिम प्रज्ञा ) च्या आधुनिक क्रांतीत नियतकालिके पण हायटेक होत कात टाकत आहेत. मात्र सरकारचे शेतकरी मासिक मात्र अजून धूळ झटकून कात टाकायला तयार नाही. शेतकरी मासिकाची कात टाकत नव्याने नीट घडी बसवली नाही तर बळीराजा प्रमाणे हे शेतकरी मासिक आत्महत्येची वाट धरेल. शेतकऱ्यांना एकेकाळी आशेचा किरण वाटणारे हे मासिक आता शेतकऱ्यांनाच सांगू लागलं आहे की, तुझं दुःख मला कळतंय, पण मीच आता संपायला आलोय !

राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतीची माहिती, बाजारभाव, हवामानाचा अंदाज, शेतीविषयक कायदे, सरकारच्या विविध योजना, घरकुल मिळवताना नेमके काय करावे, शेततळे कोणाला मिळेल अशा अनेक प्रकारच्या नियमावली धोरणाची माहिती देणारे शेतकरी मासिक जुन्या बातम्या व जुने लेख देत असल्याने शेतकऱ्यांना त्याचा काहीच उपयोग होत नाही. म्हणजे पाऊस आला पूर आला सर्व नुकसान झाले मग शेतकरी




मासिक शेतकऱ्यांच्या हातात येते. असा हा प्रकार सरकारने सुधारावा अशी मागणी शेतकरी करू लागले आहे.


या मासिकाचे योग्य नियोजन केले की शेतकरी आत्महत्या कमी होतील, जे प्रगतशील शेतकरी आहेत त्यांच्या मार्गात भविष्याचा वेध घेणाऱ्या शेतीची माहिती असणारे संपादकीय लेख असणे गरजेचे आहे. यात सुधारणा केली नाही तर शेतकऱ्याप्रमाणे हे मासिक आत्महत्येच्या मार्गावर जाईल.

राज्यभरात ४० हजार शेतकरी आपल्या शेताचे भले व्हावे म्हणून वर्गणी भरून वाचतात. मात्र त्यांना नवीन काहीच मिळत नाही. जगाने एवढी क्रांती केली आहे मात्र हा अंक शेतकऱ्यांना वेळेवर मिळत नाही. खाजगी अंक वेळेत मिळतात मग सरकारचा शेतकरी अंक वेळेत का मिळत नाही ? असा सवाल सोलापूरचे डाळिंब द्राक्ष प्रगतशील शेतकरी संजय पवार यांनी केला आहे.

आम्ही वर्गणी भरायची व अंक उशिरा वाचायचा असे का ? सरकारने शेतकऱ्यांना हा अंक मोफत दिला पाहिजे. ऑनलाइन सर्वत्र वाचायला मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांच्या पिकावर गब्बर होणारे दलाल या अंकाच्या माध्यमातून जनजागृती करत दूर केले पाहिजेत.

कृषिमंत्री रोज नवनवीन कपडे घालतात अशी विरोधी पक्षांनी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर खिल्ली उडवत समाज माध्यमावर चर्चा केली. हाच धागा पकडत कृषी मंत्र्यांनी या मासिकात नाविन्य आणावे. ए आय च्या क्रांतीत कृषी क्रांती ची बीज नव्याने रुजवली तर बळीराजा हे शेतकरी मासिक आनंदाने वाचण्यासाठी सज्ज होईल. नाहीतर शेतकऱ्याप्रमाणे हे मासिक पण आत्महत्या करेल.

Best Opportunity For



House Wife
Retired
Teacher
Businessman

We are fastest growing organization
Work Fulltime or Part time as per your requirement
No Target, No Investment
Reward & Recognition
Opportunity For Domestic & International Trip

Hurry Up Limited Seats

Provident Fund + Medical Benefits
Education: 12th pass to Graduates
Entry Age: 30 years to 65 years

Earn Fixed salary upto Rs.30,000/- & incentives upto 2 lakhs p.m.

Gauri gaikwad:8898632067

# रखरखीत लाल चळवळीतला सुगंधी गुलाब कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य

स्वातंत्र्यसैनिक, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते, गोवा मुक्ती व संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील, गिरणी कामगारांचे झुंजार नेते, मुंबई महानगरपालिकेचे माजी नगरसेवक आणि माजी विरोधी पक्ष नेते व लोकप्रिय माजी आमदार दिवंगत कॉम्रेड गुलाबराव भाऊराव गणाचार्य यांचा ५२ वा स्मृतिदिन गुरुवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२५ रोजी चिंचपोकळी (पश्चिम) येथे कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य चौक (आर्थर रोड नाका) मुंबई येथे सकाळी १० वाजता त्यांच्या स्मारका जवळ साजरा करण्यात येणार आहे. दरवर्षी विविध पक्षातील कार्यकर्ते त्यांना श्रद्धांजली अर्पण करतात.अश्या कॉ. गुलाबराव गणाचार्य यांच्या विषयी लेखाद्वारे श्रध्दांजली अर्पण करतो.

रखरखीत चळवळीतला सुगंधी गुलाब म्हणजे कॉम्रेड गुलाबराव गणाचार्य यांचेच नाव घ्यावे लागेल. आर्थर रोड नाक्यावर पानसरे चाळीत माझे लहानपणा-पासून वास्तव्य होते. माझ्या घरासमोरील केरमाणी चाळीत त्यांचे वास्तव्य होते. त्यामुळे लहानपणापासून गिरणगावातला लढा मला पाहायला मिळाला. यामध्ये कॉ. गुलाबराव गणाचार्य अग्रेसर होते. त्यांना लहानपणापासून भाषण करताना पाहिले होते. त्यांचे भाषण म्हणजे ज्वालामुखी.

२१ मे १९१८ साली अहमदनगर येथील जामखेड तालुक्यातील खर्डा गावात गुलाबरावांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण सातवीपर्यंत झाले. पुढे काही काळ त्यांनी तलाठ्याचे काम केले. पण



नोकरी करून सर्वसामान्य माणसासारखा संसार थाटने हा गुलाबरावांचा पिंड नव्हता. लहानपणापासून देशासाठी, स्वातंत्र्यासाठी जे लढे दिले जात होते ते महात्मा गांधींच्या प्रेरणेतले असोत किंवा क्रांतिकारकांच्या बलिदानातून उभे राहिलेले असोत प्रत्येक लढ्यात गुलाबराव सक्रिय होते. मुंबईत आल्यावर ते खटाव मिलमध्ये कामाला लागले. विवाह झाल्यानंतर त्यांनी आर्थर रोड नाक्यावरील चिंचपोकळी येथील केरमाणी बिल्डिंगमध्ये संसार थाटला. गुलाबराव हे संघर्षशील वृत्तीचे हाडाचे कार्यकर्ते होते. कॉम्रेड बापूराव जगताप यांच्याशी ओळख आणि मैत्री झाल्यानंतर दोघांनीही कामगार चळवळीत जे लढे दिले गिरणी कामगारांत जी लढाऊ आणि राजकीय जाणीव निर्माण केली ती लक्षणीय आहे.

ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात नागरिकांनी जो लढा दिला त्याला मुंबईच्या कामगारांनी रस्त्यावर उतरून पाठिंबा दिला या आंदोलनात गुलाबराव आघाडीवर होते.

१९५० सालच्या गिरणी कामगारांच्या संपात ते सक्रिय होते. १९५२ साली त्यांचा समाजवादी गट भारतीय कम्युनिस्ट पक्षात सामील झाला. गुलाबरावांनी केवळ गिरणी कामगारांना संघटित केले असे नाही, तर असंघटित कामगार विशेषतः हॉटेल कामगार, सलून कामगार यांचे त्यांनी नेतृत्व केले. त्यांच्यासाठी त्यांनीअनेकदा तुरुंगवास भोगला. गिरणी कामगारांच्या लढ्यात आणि संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात तेजाने तळपणारे गुलाबराव अनेकांनी पाहिले आहेत. महापालिकेत नगरसेवक आणि विधानसभेत आमदार म्हणून भूमिका बजावताना त्यांनी कष्टकरी कामगार आणि सर्वसामान्य माणसांची बांधिलकी कायम जपली होती.

खानदेशात असताना साने गुरुजींच्या सहवासात वाढलेले गुलाबराव हे मुंबईच्या कामगारांना मोठे आधार वाटत होते. मुंबई हे कामगारांचे कष्टकऱ्यांचे शहर होते. सुती कापडाच्या गिरण्या, सिल्कच्या गिरण्या, इंजिनियरिंग उद्योग, रसायनांचे कारखाने, अवजड उद्योग, बंदरातल्या गोद्या, कापड बाजार, दवा बाजार अशा वेगवेगळ्या प्रकारची घाऊक आणि किरकोळ मार्केट, शेअर बाजार, सिने उद्योग आणि स्टुडिओ यामुळे भारताच्या कानाकोपऱ्यातून कष्टकरी मुंबईत यायचा. त्याच्या हाताला या शहरात काम मिळत होते. त्यांचे नशीब उघडत होते. दिवसरात्र धडधडणारे कारखाने काम करणारे कामगार यामुळे या शहरात सळसळते चैतन्य होते. गिरणगाव, गिरगाव आणि वाळकेश्वर अशी त्यावेळेची मुंबई होती. तसेच या देशातले नामवंत कामगार पुढारी होते. भारतातील कामगार चळवळीचे अध्वर्यू नारायण मेघाजी लोखंडे यांनी देशात प्रथम कामगारांना संघटित केले आणि त्यांना आठवड्याची रजा मिळवून दिली हे येथे नमूद करावेसे वाटते. त्यामध्ये त्यांचा सिंहाचा आणि तीन-तीन पाळ्यांमध्ये वाटा होता.१९५७ साली संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार म्हणून गुलाबराव मुंबई महापालिकेवर निवडून गेले. १९६१ साली ते पुन्हा मुंबई महानगरपालिकेत निवडून गेले. पुढे १९६७ च्या निवडणुकीत विधानसभेत गेले. गुलाबराव फर्डे वक्ते होते. विधानसभेत ते कामगार आणि कष्टकऱ्यांच्या बाजूने वसंतराव नाईक सरकारशी लढत राहिले.

हा नेता २० नोव्हेंबर १९७३ साली इहलोकातून निघून गेला. त्यांची आर्थर रोड नाक्यावरून प्रचंड मोठ्या प्रमाणात अंत्ययात्रा निघाली. या अंत्ययात्रेचा मी छोटासा साक्षीदार आहे.

आजही मी आर्थर रोड नाक्यावरील कॉ. गुलाबराव चौकामध्ये जातो तेव्हा गुलाबराव यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही.

**- नासिकेत पानसरे**

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# औषध सुरक्षितता सप्ताह संपन्न; कामोठे खांदा कॉलनी मध्ये जनजागृती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर) :** महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या औषध माहिती केंद्राच्या माध्यमातून राज्यभर मेडी सेफ्टी विक उत्साहात साजरा करण्यात आला. या वर्षीची मुख्य संकल्पना रिपोर्टिंगमुळे औषधे अधिक सुरक्षित होतात. अशी होती त्यानुसार जनजागृती आणि प्रबोधन करण्यात आले. पनवेल परिसरात कामोठे आणि खांदा कॉलनी अशा प्रकारचे चर्चासत्र घेण्यात आले. त्याचबरोबर महाराष्ट्रभर जनजागृती करण्यात आली.

उपक्रमामध्ये परिषदेच्या औषध माहिती केंद्र उपसमिती अध्यक्ष गणेश बंगाळे यांनी भारतीय औषध परिषदेचे प्रतिनिधी जगन्नाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली औषध सुरक्षिततेचे संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा विशेष प्रयत्न केला गेला.

या मोहिमेअंतर्गत ५० हून अधिक फार्मसी प्राध्यापक आणि समन्वयक यांना आरोग्य क्षेत्राबाहेरील संस्था, महाविद्यालये, उद्याने, बसस्थानके, जिम, ग्रामपंचायती अशा विविध ठिकाणी जनजागृती सत्रे घेण्याचे आवाहन करण्यात आले.

राज्यभर तब्बल ४१० सत्रे घेण्यात आली. यामध्ये औषधांचा सुरक्षित वापर, दुष्परिणाम, अहवाल नोंदविण्याची पद्धत, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी फार्मासिस्टची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे ३०,००० पेक्षा जास्त नागरिक औषधांचा सुरक्षित वापर, सुरक्षित साठवणूक, दुष्परिणाम नोंदवण्याची पद्धत याबाबत शिकले. या मोहिमेत सहभागी सर्व समन्वयक आणि प्राध्यापकांना महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या वतीने प्रशस्तीपत्रक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. उपक्रमाचे संपूर्ण संयोजन औषध माहिती केंद्राच्या तांत्रिक सहाय्यक डॉ. विनया कुलकर्णी आणि भूषण माळी यांनी यशस्वीरीत्या पार पाडले. परिषदेचे अध्यक्ष अतुल अहिरे म्हणाले, महाराष्ट्रातील प्रत्येक घरापर्यंत औषध सुरक्षिततेचा संदेश पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे.

या मोहिमेचे यश फार्मासिस्ट शिक्षक आणि जनसामान्य यांच्या सहकार्याचे फलित आहे.परिषदेच्या निबंधक सायली स्वनिल मसाल यांनी मोहिमेचे मार्गदर्शन केले. या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील नागरिकांना औषधांचा तर्कसंगत आणि सुरक्षित वापर करण्यास प्रोत्साहन देणे, फार्मासिस्टचा सक्रीय सहभाग वाढवणे आणि औषध सुरक्षा संस्कृतीला बळकट करणे हे उद्दिष्ट साध्य झाले असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

# पिंपळवाडी ग्राम पंचायतीच्या खुर्चीसाठी शालेय मुला,मुलींच्या १०० सायकली झाल्या भंगार

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभाग पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे :** पैठण तालुक्यातील सर्वात मोठे पुनर्वसित गाव अन्त्या सोबतच तब्बल १७ सदस्य असलेली पिंपळवाडी (पि) ग्रुप ग्राम पंचायत कार्यालय या ना त्या कारणा मुळे सतत चर्चेत असते.या ग्राम पंचायतीने सन २०२०-२०२१ मध्ये तत्कालीन सरपंच शंकर वाघमोडे यांच्या कार्यकाळात १४ वित्त आयोगामधून गावापासून दूर राहणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना शाळेत येणे जाणे सुलभ व्हावे या उदात्त हेतूने सुमारे १०० सायकल खरेदी केल्या होत्या.परंतु ते सरपंच पदावरून पायउतार झाल्याने त्यांच्या नंतर ग्रामपंचायतचा कारभार हाकणाऱ्या कारभाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे त्या सायकली विद्यार्थांना वाटप झाल्या नसल्याने त्या तशाच पडून राहील्याने भंगार बनल्या आहे.सन २०२०-२१ वर्षात १४ वित्त आयोगाच्या निधीतून खरेदी केलेल्या या १००



सायकलींचा प्रवास ही तसा रंजक आहे.ग्राम पंचायत हाकणाऱ्या कारभाऱ्यांच्या खुर्चीच्या खेळात मागील पाच वर्षाच्या कालावधीत या सायकलींचा मुक्काम कधी जायकवाडी उत्तर येथील शाहू विद्यालयात तर कधी पिंपळवाडी येथील जिल्हा परिषद शाळा असा इकडे,तिकडे झाला असल्याने या सायकलींचे टायर, ट्यूब, सीट, इतर साहित्य खराब होऊन त्यांची अत्यंत भंगार अवस्था झाली आहे. तत्कालीन सरपंच शंकर वाघमोडे यांच्या कार्यकाळात खरेदी केलेल्या सायकली त्या नंतरच्या सरपंच मंदा दहीहांडे आणि विद्यमान सरपंच रेणुका दिलवाले यांच्या खुर्चीच्या खेळात विद्यार्थ्यांना या सायकलींचे वाटप करण्यात आली नाही. तसेच या सायकल कधी वाटप होणार ? कोण करणार ? याचे उत्तर देखील पिंपळवाडीचे आजी-माजी सरपंच देत नसल्यामुळे आणि ज्या शाळेच्या खोल्यांमध्ये मुलांना ज्ञानाचे धडे दिले जातात त्याच वर्ग खोल्यांमध्ये या सायकलींचा मुक्काम गेल्या पाच वर्षांपासून असल्याने येथील मुलांची गैरसोय होत असल्याने शालेय समितीचे अध्यक्ष जावेद फरीद शेख यांनी या ग्राम पंचायत कार्यालयास सदर सायकली येत्या ८ दिवसात वाटप कराव्यात अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असे निवेदन दिले.

पिंपळवाडी ग्रामपंचायतीचा या सायकली बरोबरचा अजून एक कारभार कित्येक दिवसापासून अंधारातच आहे. तो म्हणजे तत्कालीन सरपंच मंदा दहीहंडे व ग्राम विकास अधिकारी निवारे यांच्या कार्यकाळात एका शेतकऱ्याच्या नावावर तब्बल १५ लाख रुपयांचा निधी परस्पर गेला. त्या नंतर सरपंच मंदा दहीहंडे या पायउतार झाल्या व ग्राम विकास अधिकारी निवारे यांची बदली झाली.त्यांच्याजागी दुसरे सरपंच व ग्राम विकास अधिकारी आले. तद्नंतर अनेकदा तात्पुरते कागदी घोडे नाचवले गेले.परंतु तो निधी संबंधितांकडून अद्याप ही जाणूनबुजून वसूल केला गेला नसल्याची चर्चा आता गावातील नागरिकात होत आहे.त्यामुळे विद्यमान सरपंच रेणुका दिलवाले या १५ लाखाची वसुली कशा पद्धतीने करतात याची वाट पाहणे उचित ठरेल.

तत्कालीन सरपंच शंकर वाघमोडे यांच्या कार्यकाळात सन २०२०-२०२१ मध्ये १४ चौदाव्या वित्त आयोगामधून विद्यार्थ्यांसाठी या सायकली खरेदी केल्या. परंतु त्यांचा कार्यकाल संपला अन् त्यांचे वाटप करणे थांबले, पुढील निवडणुकीत विद्यमान सरपंचांचा पराभव होऊन मंदा दहीहंडे या सरपंच झाल्या.त्या तरी त्यांच्या कार्यकाळात सायकली वाटप करतील असे वाटले परंतु त्यांनीही तीन वर्ष याकडे कानाडोळा केला.आणि त्यानंतर त्यांचेही पद जावून सरपंचपदी रेणुका दिलवाले या विराजमान झाल्या आता येणाऱ्या पुढच्या फेब्रुवारी मधे त्यांचाही कार्यकाळ संपणार असल्याने उरलेल्या दोन तीन महिन्यात त्यातरी या सायकली वाटप करतात की त्याही ये रे माझ्या मागल्या या म्हणी प्रमाणे दुर्लक्ष करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.त्यामुळे येथे मराठी भाषेतील एक म्हण तंतोतंत लागु पडते की " लबाडाचे आमंत्रण जेवल्या शिवाय काही खरे नाही,हे ही तितकेच खरे.

# मंत्रिमंडळाचे ५ मोठे निर्णय जाहीर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** मंत्रिमंडळाची साप्ताहिक बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील पार पडली यामध्ये महत्त्वाचे ५ निर्णय घेण्यात आले

• (नगर विकास विभाग)

राज्यातील सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील जमिनी, भुखंडाचा सुयोग्य वापर निश्चित करण्यास प्राधान्य. संकल्पना आधारित आयकॉनिक शहर विकासासाठी धोरण जाहीर. सिडकोसह, अन्य प्राधिकरणांना संबंधित संकल्पनांवर आधारित एकात्मिक वसाहती निर्माण करण्याकरिता अधिकार मिळणार. निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी होणार. सिडकोसह, विविध प्राधिकरणांकडील लँड बँकेचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी धोरण

**• (गृहनिर्माण विभाग)**

बृहन्मुंबई उपनगरातील वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावरील म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचे धोरण निश्चित. यातून मुंबई शहर व उपनगर क्षेत्रामध्ये नागरिकांसाठी मोठ्या प्रमाणात परवडणारी घरे उपलब्ध होणार

**• (मदत व पुनर्वसन विभाग)**

भूसंपादन, पुनर्वसन, पुनर्स्थापनेची प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी नवीन पदांची निर्मिती. यामुळे भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ६४ अन्वये दाखल असलेल्या प्रलंबित प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होणार

**• (कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग)**

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाकरिता ३३९ पदांची निर्मिती. शिक्षकांची २३२ आणि शिक्षकेतर १०७ पदांना मान्यता

**• (महिला व बाल विकास विभाग)**

महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध कायद्यातील मानहानीकारक शब्द वगळण्यास मान्यता. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधि व न्याय विभागाने केलेल्या शिफारशींनुसार महाराष्ट्र भिक्षा प्रतिबंध अधिनियम, १९५९ या अधिनियमातील कलम ९ व कलम २६ मधील महारोगाने पिडीत, कुष्ठरोगी, कुष्ठालये असे शब्द वगळणार

**• (विधि व न्याय विभाग)**

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये सुधारणा करण्यास मान्यता

# व्हि पी के उद्योग समूहाच्या वतीने कृत्रिम बुद्धिमत्ता AI तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आधुनिक ऊस लागवडीस सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर :** उमरी उद्योग समूहाचे चेअरमन मा श्री मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या उद्योग समूहाच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरू असतात आणि त्याचाच एक भाग म्हणून कृषी विज्ञान केंद्र बारामती यांनी नव्याने शोध लावलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा अवलंब आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्याने करणे अत्यंत गरजेचे आहे.पारंपरिक ऊस लागवडीची



पद्धत बाजूला सारून नवीन तंत्रज्ञानाची कास शेतकऱ्याने धरली तर नक्कीच उत्पन्नात भरीव वाढ होणार आहे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यास उत्पादन खर्चात बचत होईल आणि तंत्रज्ञानाच्या अचूक मार्गदर्शनामुळे उत्पन्नात लक्षणीय वाढ होऊन आपला शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम होईल याचा विचार करून भारतात प्रथमच होत असलेल्या या कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या प्रयोगात आपल्या कार्यक्षेत्रातील पन्नास शेतकऱ्यांना कारखान्याच्या वतीने व vsi पुणे यांच्या वतीने अनुदान देऊन सहभागी करून घेण्यात आले आहे आणि आज सहभागी शेतकरी शिवाजी गोविंदराव मुंगेवाड रा.सिंधी ता उमरी यांच्या शेतात वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट पुणे यांच्याकडून ऊस रोपे घेऊन लागवडीचा शुभारंभ उद्योगसमूहाचे जनरल मॅनेजर केन मा.गाडेगावकर साहेब व मुख्य शेतकी अधिकारी पी एम पवार साहेब,रफिक शेख साहेब, ऊस विकास अधिकारी एस जे सावंत साहेब,विभाग प्रमुख कुरे साहेब,धनराज पाटील,भास्कर पूयेड,दत्ता पुयेड यांच्यासह सर्व शेतकरी बांधव यांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला

# जिल्हास्तरीय शालेय कुराश स्पर्धा बीड येथे संपन्न होणार

**दैनिक युवक आधार**
**बीड जिल्हा क्रीडा प्रतिनिधी शरद आंदुरे :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य ,पुणे तथा जिल्हा क्रीडा परिषद पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने सन 2025-26 राज्यस्तरिय शालेय कुराश (14,17,19 वर्ष मुले व मुली ) क्रीडा स्पर्धा दिनांक 27 व 28 नोव्हेंबर 2025 स्थळ शहा सांस्कृतिक भवन, ता . इंदापूर , जि. पुणे. येथे होणार आहेत . या स्पर्धेच्या अनुषंगाने बीड जिल्हास्तर शालेय कुराश स्पर्धा



दिनांक 21 नोव्हेंबर 2025 रोजी व तसेच विभागस्तर शालेय कुराश स्पर्धा दिनांक 23 नोव्हेंबर 2025 रोजी जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे नियोजित आहेत. सदरील क्रीडा स्पर्धा या क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड व जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांचे संयुक्त विद्यमाने तसेच बीड जिल्हा कुराश असोसिएशन यांचे तांत्रिक सहकार्याने आयोजित केलेल्या आहेत.

खेळाडू नोंदणी करिता ऑनलाईन पोर्टल सुरू होईल .सर्व क्रीडा शिक्षकांनी खेळाडू नोंदणी ऑनलाईन पोर्टलवर करावी असे आवाहन कुराश असोसिएशन कडून करण्यात येत आहे.

सदरील स्पर्धेबाबत अधिकृत कार्यक्रम जिल्हा क्रीडा कार्यालय बीड यांचे परिपत्रका द्वारे जाहीर करण्यात येईल.

# म्हसळा–सांगवड मार्गावरील दुतर्फा वाढलेले गवत अपघातांना आमंत्रण

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा तालुका प्रतिनिधी शिरीष समेळ :** म्हसळा–सांगवड रस्त्यावर दुतर्फा प्रचंड प्रमाणात वाढलेल्या गवतामुळे या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

पावसाळा संपूनही रस्त्याच्या कडेला वाढलेले गवत न छाटल्यामुळे अनेक ठिकाणी अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे या रस्त्याचा वापर करताना नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

रस्त्यालगत काही ठिकाणी गवत तब्बल सात ते आठ फूट उंच वाढले असून समोरून येणाऱ्या वाहनाचा अंदाज घेणे कठीण झाले आहे. आधीच रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य, अरुंद मार्ग आणि वाहतूककोंडी या समस्या कायम असताना यामध्ये वाढलेल्या गवतामुळे



धोका अधिकच गंभीर बनला आहे. विशेषत: रात्रीच्या वेळी दृश्यता कमी होत असल्याने अपघातांची शक्यता दुपटीने वाढत आहे. नागरिकांनी याबाबत अनेकदा तक्रारी केल्या असल्या तरीही संबंधित अधिकाऱ्यांकडून याकडे पाहिले जात नसल्याचा आरोप स्थानिकांमधून केला जात आहे.

**बांधकाम विभागाचे दुर्लक्ष?**

गावागावांतील रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना गवत काढण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असते.

> “दरवर्षी रस्त्याच्या दुतर्फा वाढलेले गवत काढणे ही संबंधित खात्याची जबाबदारी आहे. येत्या आठ दिवसांत हे वाढलेले गवत काढले नाही तर पंचक्रोशीतील जनतेला सोबत घेऊन आंदोलनाचा इशारा आम्ही देऊ.”
> — प्रसाद बोर्ले, शिवसेना तालुका प्रमुख,म्हसळा

मात्र, प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणात गवत वाढूनही अनेक महिने छाटणी न केल्याने विभागाचे दुर्लक्ष स्पष्टपणे दिसून येत आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधला असता—“गवत काढण्याचे काम लवकर सुरू करू,” अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. परंतु, स्थानिक नागरिकांच्या मते ही आश्वासने दरवर्षीप्रमाणे हवेतच विरून जातात.

**स्थानीय नागरिकांचा रोष वाढतोय**

रस्त्यावर सतत होणाऱ्या लहानमोठ्या अपघातांच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

गवतामुळे रस्ता चिकट, अरुंद आणि धोकादायक बनल्याने दुचाकीस्वार, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रवास करताना अत्यंत अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहतुकीतील धोकादायक ब्लाइंड स्पॉट्स वाढल्याने वाहनचालकांमध्ये सतत भीतीचे वातावरण आहे.सदर प्रश्न गांभीर्यपूर्वक हाताळून तातडीने गवत छाटणीचे काम सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अन्यथा येत्या काळात यावरून मोठे आंदोलन पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पंचरत्न मित्र मंडळ आर.सी.एफ चेंबूर व युथ कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने चेंबूर येथे शैक्षणिक साहित्य,खाऊ वाटप

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर) :** पंचरत्न मित्र मंडळ आरसीएफ चेंबूर व युथ कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने गोवडी येथील, एम. पी. एस हिंदी शाळा येथे शैक्षणिक साहित्य वह्या वाटप तसेच शाळेसाठी कपाट, खुर्च्या टेबल व खाऊ वाटप करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती नजहत शेख मॅडम संचालक वित्त तसेच महाव्यवस्थापक संजय पेटकर साहेब सी. सी एन सी एस आर आर सीएफ ली डॉ.रजनीश कुमार, शाळेच्या मुख्याध्यापिका रमा सिंग मॅडम यांच्या उपस्थितीत २०० विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके,पेन, पेन्सिल पाऊच वाटप करण्यात आले तसेच ७५ मुलींना १५० सॅनिटरी पॅड वाटप करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुण्या श्रीमती नजहत शेख मॅडम यांनी मुलांना अभ्यास करून मोठे होऊन शाळेचे नाव कमवा व




शाळेतील गुरुजनांचा आत्मसन्मान वाढेल याची काळजी घ्यावी असे सूचित केले.

समाजात विविध क्षेत्रांत लोक कल्याणार्थ कार्यरत असलेल्या सेवाभावी संस्था आहेत. या संघटना एका विशिष्ट हेतूने काम करते यातील स्वयंसेवक स्वेच्छेने व निःस्वार्थीपणे कोणतेही काम व मदत करण्यास तत्पर असतात. या संघटना प्रामुख्याने नैसर्गिक आपत्तींत सापडलेल्यांना अनेक प्रकारे साहाय्य करतात. अन्नधान्य, कपडे, गृहोपयोगी वस्तू, औषधे, वह्या पुस्तके अशा विविध अंगांनी मदतही देतात. यांशिवाय लोकांना मूलभूत हक्कांची जाणीव करून देणे, नागरी सुविधांबद्दल जागरूक करणे, बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यास साहाय्य करणेतसेच अन्य अनेक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी सहकार्य करण्याचे काम पंचरत्न मित्र मंडळ गेली अनेक वर्षे निस्वार्थी पणे करीत आहे. समाजाचे ऋण फेडण्यासाठी सतत अनेक वर्ष कार्यरत असलेल्या आर.सी. एफ कर्मचारी वर्गाच्या पंचरत्न मित्र मंडळ (रजि.) चेंबुरतर्फे अध्यक्ष अशोक भोईर, सचिव प्रदीप गावंड, खजिनदार सचिन साळूखे, उपाध्यक्ष रमेश पाटील, सहसचिव वैभव घरत, सौ. स्नेहा नानीवडेकर, सल्लागार हनुमंता चव्हाण, सदस्य नीलम गावंड आणि सर्व महिला पुरुष कार्यकर्ते, सदस्य आणि सभासद यांच्या प्रयत्नाने अनेक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येतात.कार्यक्रम सूत्रसंचालन स्नेहा नानिवडेकर मॅडम यांनी केले.नीलम गावंड,श्रेयस घरत(समाजसेवक),श्री वैभव घरत,मॅथ्यू डिसूझा, रमेश वामन पाटील,विलास कुंभार,सचिन साळुंखे, सचिन राखाडे, प्रशांत नागपुरे,एम कार्तिकयांन,संतोष वाणी,दिलीप येवले इत्यादींनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# युवकांनी पुढे येऊन संविधान मूल्यांचा जागर करावा – आशिष धोंगडे

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे :** अमरावती–वाशिमतर्फे ‘सेल्फी विथ संविधान सप्ताह’ हा विशेष उपक्रम 20 ते 26 नोव्हेंबर 2025 या कालावधीत राबविण्यात येत आहे.ग्रामीण भागातील नागरिक, युवक, विद्यार्थी तसेच महाविद्यालयीन स्तरावर संविधानिक मूल्यांची जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने विविध कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे. या आठवड्यात अनुभव शिक्षा केंद्राने स्थापन केलेल्या ‘अनुभव कट्टा’ या सामाजिक संवाद मंचाच्या मदतीने गावोगावी जाऊन संविधानाचा जागर करण्याच्या मोहिमेला प्रारंभ करण्यात आला आहे.तर महाविद्यालयांमध्ये संविधान, नागरिकांचे हक्क,कर्तव्ये आणि लोकशाही मूल्ये या विषयांवर विशेष सत्रे घेण्यात येणार आहेत.



यासोबतच सेल्फी विथ संविधान हा उपक्रम युवकांमध्ये संविधानाबाबत आत्मीयता, अभिमान आणि जागरूकता वाढवण्यासाठी राबवला जात आहे.या संपूर्ण सप्ताहाचे आयोजन अनुभव शिक्षा केंद्राचे अमरावती–वाशिम जिल्हा प्रशिक्षक आशिष धोंगडे यांच्या मार्गदर्शनातून करण्यात आले आहे. संविधानाचा प्रसार हा केवळ शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे सामाजिक कर्तव्य असल्याचे ते म्हणाले.

युवकांना आवाहन करताना आशिष धोंगडे म्हणाले,“लोकशाही सक्षम होण्यासाठी संविधानिक मूल्यांची जाण आवश्यक आहे. हा सप्ताह नागरिकांसाठी, विशेषतः तरुण पिढीसाठी संविधानाशी नाळ जोडणारा आहे. अमरावती व वाशिम जिल्ह्यातील सर्व युवकांनी, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा.”

ग्रामीण पातळीवरील जनजागृती, महाविद्यालयीन संवाद, तसेच डिजिटल माध्यमातून सेल्फी उपक्रम अशा विविध अंगांनी सजलेला ‘सेल्फी विथ संविधान सप्ताह’ हा कार्यक्रम जिल्ह्यांत उत्साहाने पार पडेल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

# वडाळा गांवचे आठवणीतले सर



मुंबई, वडाळा गांवात जसे विठ्ठलाचे प्रतिपंढरपूर प्रसिद्ध आहे तसे, आमच्या क्लासचे सर देखील तितकेच प्रसिद्ध आहेत. आणि अत्यंत हुशार, जिद्द, झटपटीने, चिकाटीने आणि चातुर्याने अभ्यास शिकवून, सर्व विद्यार्थ्यांकडून पाठांतर करून घेणे, हे त्यांच्या उजव्या हाताचा खेळ आणि विद्यार्थिही तेवढ्याच जोमाने पाठांतर करीत असे.

आमची १९९८ ची बॅच आजही आठवते. सर ते सरच, ते कुठलेही असो. क्लासचे असो वा शाळेचे. यंदा २०२५ मध्ये २७ वर्षे झाली. आणि नवीन उमेद मिळाली. सरांना भेटण्याचा योग आला,आणि आजही आम्हाला आमच्या क्लासच्या निमित्ताने आमची शाळा, शाळेचा मैदान, बसायचा बाक, आमचे शिपाई मामा, आमचे सर, मॅडम आजही आठवतात आणि जास्त आठवण येते ती म्हणजे आमच्या क्लासचे सर. विद्यार्थांना शिकवून आम्हाला भेटण्यासाठी जेव्हा घरी आले, तेव्हा आम्ही सर्वांनी उभे राहून, आदरपूर्वक पायाला दोन्ही हात लावून नमस्कार केला. पाचवीपासून दहावीपर्यंत एकत्र क्लासमध्ये अभ्यास घेऊन जे काही विद्यार्थी त्यांनी असे घडविले, कि ते विद्यार्थी आता शिकून सातासमुद्रापार गेले आहेत. मोठमोठ्या हुद्द्यावर आज आहेत. तेही सर्व त्यांची आठवण काढत असतात. जेवढा काठीचा मार म्हणजेच (दंडाराज) मिळायचा तेवढा अभ्यास व पाठांतर तेवढ्याच ताकदीने व्हायचा. आजही हातावर मार खाल्लेला दंडाराज आठवतो. एकदा दंडाराज हातावर पडला की, दुसऱ्या दिवशी क्लासला येण्यासाठी विद्यार्थी कंटाळा करायचे. पण विद्यार्थी वेळेवर येत असत. आईवडिलांची माया त्यांनीही केलीय. हे कोणासाठी आमच्यासाठीच, हे आता आम्हाला कळतय. एवढं मारून, गोंजारून, काही येत नसेल तर ते सारखं सारखं सांगणे. हा त्यांचा आगळा वेगळा स्वभाव.

एवढा प्रसिद्ध क्लास की, त्या वडाळा गांवचे सर्व मुले जास्तीच जास्त विद्यार्थी, विद्यार्थीनी एकाच दादर हिंदू कॉलनी, किंगजॉर्ज शाळेत जात असल्याने क्लासही बऱ्याच जणांचा तोच असायचा. यात दुमतच नाही. तेव्हा हा क्लास एवढा प्रसिद्ध होता की, जो तो विद्यार्थी तिथेच शिकवणी घेण्यासाठी आतुर असायचे. आजही ते सर जसे दिसत होते तसेच, आम्हाला भेटले आहेत. तेही २७ वर्षानंतर, पण दुसऱ्या विभागात. विभागाची नवीन सुधारणामुळे त्यांना तिथून जावे लागले. मोबाईलमध्ये ज्या नावाचा क्लास आहे त्या नावाने ग्रुप सुद्धा सूरू आहे. आजही क्लास सुरु आहे पण नेरुळला. पत्नीच्या नावाने हे क्लास आज नेरुळच्या विद्यार्थ्यांना घडवीत आहे. तिथे ते स्वतः, त्यांची पत्नी, मुलगी, मुलगा, भावाची मुलगी हे पाचजण आजही सर्व विद्यार्थ्यांना ट्यूशनच्या नावाप्रमाणे संजीवनी देण्याचे अहोरात्र प्रयत्न करित आहे. विभाग बदलला म्हणून हार न मानता त्यावर मात करुन उज्वल यश मुलांना कसे प्राप्त करता येईल यावर जास्त भर हे संपूर्ण कुटुंब करीत आहे. अश्या ह्या कुटुंबाला आम्ही सर्व मित्र मैत्रिणी, आणि तुमचे अखंड असलेले विद्यार्थी नतमस्तक होऊन, हात जोडून, मनपूर्वक व आदराने नमस्कार करीत आहोत.

# शब्दांची मैफिल मनाला नवीन ऊर्जा देते - लोकनेते रामशेठ ठाकूर

## पनवेलमध्ये साहित्यिकांचा सत्कार आणि कवी संमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : हृदयातील भावना म्हणजे साहित्य,कवी-साहित्यिक लिहितात ते खऱ्या अर्थाने हृदयाला भिडत. आयुष्याच्या धकाधकीत मनाला समाधान वाटत असेल तर साहित्यिक कार्यक्रमाला जावे,कवी संमेलनातील शब्दांची मैफिल ही मनाला नवीन ऊर्जा देते असे उद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल येथे काढले.श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कवी संमेलन समारंभ प्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. या सोहळ्यास सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे, ज्येष्ठ गझलकार ए.के.शेख,भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख, माजी



उपमहापौर व जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी,पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके उपस्थित होते.

कोमसाप पनवेल शाखेचे माजी अध्यक्ष रोहिदास पोटे यांच्या गझलगंधाक्षरी ग्रंथाला कोकण मराठी साहित्य परिषदेचा प्रभाकर पाटे स्मृती समीक्षा पुरस्कार,नवीन पनवेल शाखेचे माजी अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मढवी यांनाही उधळ्या कांदबरीला वि.वा.हडप स्मृती विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल,नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांची केंद्रीय कार्यकारिणीवर निवड झाल्याबद्दल व शाखेच्या सदस्या योगिनी वैदू यांना रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांची राज्य शासनाच्या वंदे मातरम् गीताच्या १५० व्या वर्धापन दिन समितीवर तालुकास्तरीय प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल आणि खोपोली शाखेचे सदस्य डॉ.सुभाष कटकधौंड यांच्या पुन्हा एकदा नव्याने जगायचे मला या एकांकीला कोकण मराठी साहित्य परिषदेचा प्रथम क्रमांकाचा रमेश किर पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला

यावेळी बोलताना सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे म्हणाले ज्या पद्धतीने आजच्या कवी संमेलनामध्ये कविता सादर होतात,अशा सुंदर कवितांमुळे कवींमध्ये मोठा बदल झालेला दिसत आहे.कविता लिहितो,त्यात शब्द असे हवेत की भरून आलं पाहिजे. आपलं जगणं पण गाणं झालं पाहिजे.जगण्याचे गाणे व्हावे ते गाणे सुंदर व्हावे.रामशेठ ठाकूर यांच्यात साहित्याचा अनुबंध राहिला आहे कारण ते शिक्षक होते. मराठीच्या सगळ्या पाठावर पनवेलचे नाव साहित्यिक म्हणून घेतले जाईल असे सांगून पनवेलची सांस्कृतिक जबाबदारी लोकनेते रामशेठ ठाकूर या नावाच्या शिक्षकांनी घेतली आहे. एखादं गाव एखाद्या साहित्यिकाचे कौतुक करतो हा साहित्यिकाचा सन्मानच आहे असे शेवटी सांगितले.

ज्येष्ठ गझलकार ए.के. शेख यांनी, साहित्यिकांचे गाव असा पनवेलचा नावलौकिक साहित्यिक वर्तुळात घेतलं गेलं पाहिजे.साहित्य लिहा, पनवेलचे नाव उज्ज्वल करा असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी जेष्ठ कवी अश्व नायगावकर यांचेही भाषण झाले.यावेळी कविसंमेलन रंगले. सुप्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर, प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, ज्येष्ठ गझलकार ए.के. शेख यांच्यासह उपस्थित कवींनी सादर केलेल्या कवितांनी सभागृह भारावून गेले. सामाजिक वास्तव,मानवी नात्यांची उब, निसर्ग, प्रेम,अनुभवांचे रंग आणि भावविश्वाचे विविध पैलू कवितांमधून खुलून आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी केले.उपस्थितांचे आभार कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रज्ञा जाधव यांनी केले.

# ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचा वार्षिक कला-क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक मंडळ प्रभात मित्र मंडळ आयोजित वार्षिक कला, क्रीडा व संगीत महोत्सव ज्येष्ठ नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वीपणे पार पडला. १२ ते १६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान झालेल्या या स्पर्धांचे उद्घाटन मंडळाचे सल्लागार आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विक्रोळी विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले यांच्या हस्ते करण्यात आले.

मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड, सचिव नासिकेत पानसरे यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांनी महोत्सवाचे सुयोग्य नियोजन केले. गायन, कॅरम, मटका फोडी, संगीत खुर्ची, थ्रो बॉल आणि बकेट बॉल अशा विविध स्पर्धांमध्ये ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

**स्पर्धांचे निकाल:**

कॅरम स्पर्धा :
प्रथम : श्री. अनिल मोरे
द्वितीय : श्री. विवेक गायकवाड
तृतीय : श्री. हरीदास मोरे

**गायन स्पर्धा :**
प्रथम : श्री.पंढरीनाथ घोडके
द्वितीय : श्री. सुभाष टोके, श्री. दत्तात्रेय पोतेकर
तृतीय : श्री. शंकर पाटील, श्री. संजय सावंत

**मटका फोडी स्पर्धा :**
प्रथम : श्री. अजय सावंत
द्वितीय : श्री. बाबुराव सणस

**संगीत खुर्ची स्पर्धा :**
प्रथम : श्री. हरीदास मोरे
द्वितीय : श्री. विवेक गायकवाड
तृतीय : श्री. सुनील मोरे

**थ्रो बॉल :**
प्रथम : श्री. विवेक गायकवाड
द्वितीय : श्री. हरीदास मोरे
तृतीय : श्री. अर्जुन कलगुटकर

**बकेट बॉल :**
प्रथम : श्री. सुनील मोरे
द्वितीय : श्री. मोहन परब
तृतीय : श्री. विवेक गायकवाड

गायन स्पर्धेचे परीक्षण श्री.तुकाराम शिंगोटे आणि बाबुराव सणस यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी श्री. अजय सावंत, श्री. हरीदास मोरे, श्री. अरुण मोरे, श्री. अनिल मोरे, श्री. अर्जुन कलगुटकर यांसह अनेक सदस्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड आणि सचिव नासिकेत पानसरे म्हणाले, कि "महोत्सवामुळे ज्येष्ठ नागरिकांना कलाविकास आणि मनोरंजनासाठी



उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले. पुढील वर्षी अधिक व्यापक स्वरूपात महोत्सव आयोजित करण्याचा मानस आहे."

उद्घाटक शंकर ऊर्फ नाना ढमाले यांनी ज्येष्ठांचा उत्साह दखलपात्र असल्याचे सांगत, "अशा उपक्रमांमुळे सामाजिक एकोपाही वृद्धिंगत होतो,"* असे प्रतिपादन केले.या महोत्सवामुळे विक्रोळी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांत आनंद व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रभात मित्र मंडळाने आगामी काळातही अशा उपक्रमांची मालिका राबवण्याचे आश्वासन दिले आहे.

# स्थानिक निवडणुका स्वबळावर लढण्याच्या कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर करा; सर्वांनीच सबुरीने घ्यावे: हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक युवक आधार**
**मुंबई/बुलढाणा :** लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मविआ एकत्र लढली असता लोकसभेला मोठे यश मिळाले पण विधानसभेला मात्र अपयश आले, त्यावेळी नविन भिडूचा विचार नव्हता. बिहारच्या निवडणुकीत काँग्रेस व राजदबरोबर १० पक्षांची आघाडी होती, मतचोरीच्या पार्श्वभूमीवर निकाल वेगळेच लागले. आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका स्वबळावर लढाव्यात अशी कार्यकर्त्यांची भावना आहे आणि त्याचे स्वागत केले पाहिजे आणि सर्वच पक्षांनी सबुरीने घेतले पाहिजे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.बुलढाण्यात पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भाजपाविरोधात काँग्रेसचा मोठा लढा सुरु आहे. काँग्रेसचा विचार संपवण्यासाठी आरएसएसची स्थापना झाली. आज देशात भाजपा व काँग्रेस या दोन भिन्न विचारधारा आहेत, ही जुनी वैचारिक लढाई आहे. मुठभर लोकांनी श्रीमंत व्हावे ही भाजप संघाची भूमिका काँग्रेसला मान्य नाही आणि त्याविरोधात सर्वात मोठं रणशिंग काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुकारलेले आहे. काँग्रेसचे वैचारिक भांडण भाजपा आणि पुंजीपतीविरोधात आहे. राहुल गांधी यांच्या या लढ्यात इतर पक्षांनीही साथ द्यावी असे आवाहन करत प्रत्येक पक्षाला स्वतःचे मत असते हे उद्धव ठाकरे यांनीही म्हटले आहे. इंडिया आघाडीत नवा पक्ष येत असले तर त्याची चर्चा राष्ट्रीय पातळीवर होईल त्यासाठी तसा प्रस्ताव असायला हवा पण प्रस्तावच नाही तर त्यावर चर्चा काय करणार, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.वंचित बहुजन आघाडीबरोबरच्या आघाडीवर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, आघाडी वा युती करण्याचे अधिकार काँग्रेस पक्षाने स्थानिक पातळीवरील नेत्यांना दिले होते तशीच भूमिका वंचितनेही घेतली होती. त्यानुसार दोन्ही पक्षाच्या जिल्हा स्तरावरील नेत्यांनी चर्चा करून आघाडीबाबतचा निर्णय घेतला पण त्यानंतर चर्चेत काही अडथळा आला असेल तर त्यातून मध्यम मार्ग काढणे शक्य आहे. दोन दोन अर्ज भरले ते टाळता आलं असते. काँग्रेस व वंचित या दोन पक्षाची आघाडी व्हावी ही दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांची भावना आहे आणि आघाडी घोषीत झालेली आहे, ती तोडण्याचा प्रश्नही नाही. आता या परिस्थितीतून पुढे जाण्याच्या अनुशंगाने काँग्रेस सकारात्मक पाऊल टाकेल. संविधानवादी सर्वांनी एकत्र येऊन शिव, शाहु, फुलेंचा लढा पुढे घेऊन जाण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी प्रयत्न करु, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# पारवा पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार हेमंत चौधरी यांचे, सर्व गावातील पोलीस पाटील यांच्या हस्ते स्वागत !




**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटंजी तालुक्यातील पारवा पोलीस स्टेशनमध्ये नवनियुक्त ठाणेदार हेमंत चौधरी यांनी पदभार स्वीकारताच परिसरातील सर्व पोलीस पाटील पदाधिकाऱ्यांनी त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. या स्वागत सोहळ्यात उबदार वातावरण आणि आनंदाचा माहोल पाहायला मिळाला.

पदभार स्वीकारल्यानंतर ठाणेदार हेमंत चौधरी साहेबांनी तात्काळ सर्व पोलीस पाटलांची बैठक घेतली.या वेळी त्यांनी पोलीस पाटील यांच्या भूमिकेचे महत्त्व सांगितले. गावातील माहिती व सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस पाटील यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या सहकार्याने परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत ठेवता येईल."तसेच कोणताही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देण्याचे सूचना त्यांनी दिले.या बैठकीला पारवा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गावांचे पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी ठाणेदार साहेबांना सहकार्याची ग्वाही देत त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करण्याची तयारी दर्शवली.पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन ठाणेदार चौधरी यांचे मनापासून स्वागत केले आणि नवीन कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# घोटे बंधू विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय विधी सेवा जनजागृती दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित धोटे बंधू विज्ञान महाविद्यालयात येथे दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा न्यायालय गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विधी सेवा जनजागृती सप्ताहानिमित्त एक माहितीपूर्ण व प्रभावी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये व समाजात कायदेशीर हक्क, मोफत न्यायसाहाय्य, POCSO कायदा, सायबर सुरक्षा आणि POSH अधिनियमाविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. अंजन नायडू यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व महाविद्यालयाचे संस्थापक स्व. श्री मनोहरभाई पटेल यांना पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली.

या प्रसंगी .अॅड .श्री. अतुल पेढे, अॅड. कु. प्रिती तुरकर, श्री. सोनेवणे (सायबर सेल), डॉ. अंजन नायडू, डॉ. मनोज पटले आणि श्री. नरेश आसाटी हे मान्यवर उपस्थित होते.

वक्त्यांनी विद्यार्थ्यांना कायदेविषयक हक्क, न्याय, नागरिकांची कर्तव्ये, तसेच युवकांवर वाढणारे सायबर गुन्हे, अमली पदार्थांचे दुष्परिणाम, लैंगिक छळ, व POCSO कायद्याअंतर्गत महत्त्वाच्या तरतुदी याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षा उपाययोजना आणि कायदेशीर संरक्षण अधिक




स्पष्टपणे समजले.अॅड. सौ. प्रिती तुरकर यांनी POCSO कायद्याचे उद्दिष्ट, तरतुदी आणि बालकांच्या संरक्षणातील त्याचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. तसेच कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा, शैक्षणिक संस्था आणि समाज यांची जबाबदारी स्पष्ट केली.श्री. सोनेवणे, सायबर सेल यांनी डिजिटल युगातील वाढते धोके—ऑनलाइन फसवणूक, ओळख चोरी, सायबर बुलिंग, सोशल मीडियाचा गैरवापर—याबद्दल मार्गदर्शन केले. ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया, सायबर सेलचे कार्य आणि सायबर सुरक्षेसाठी घ्यावयाच्या उपाययोजनांची माहितीही दिली.

डॉ. अंजन नायडू यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले आणि आयोजक समितीच्या प्रयत्नांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी समाजाप्रती जबाबदारी जाणून कायदेशीर तरतुदींचा प्रभावीपणे वापर करावा असे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा, बालहक्क, आणि कायदेशीर उपाययोजना यांबाबत प्रश्न विचारून संवादात्मक सत्रात सहभाग घेतला. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता प्रभावीपणे वाढवली व समाजातील दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी कायद्यांचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन डॉ. के. पी. घोषाल (ICC सेल अध्यक्ष) यांनी केले, तर डॉ. मनोज पटले (IQAC समन्वयक) यांनी आभार प्रदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. दिलीप चौधरी, वरिष्ठ डॉ. पालीवाल, प्रा. धुवारे, प्रा. राजकुमार पटले सर्व पदवी व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी आणि रासेयो स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी व प्रेरणादायी बनवला.

# सीकेटीच्या अवधूत नाईकची राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड; सीकेटी विद्यालयाचा अभिमान; उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** क्रीडा व युवक संचालनालय पुणे व महाराष्ट्र राज्य आणि मुंबई उपनगर क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अमेया क्लासिक क्लब यशवंत नगर विरार येथे झालेल्या मुंबई विभागीय स्केटिंग स्पर्धेमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक (सी के टी) विद्यालयातील इयत्ता बारावीतील



अवधूत सागर नाईक या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकाविला असून त्याची राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अवधूत नाईकने स्पर्धेत दाखवलेल्या कौशल्यपूर्ण खेळी, गती आणि धैर्याची परीक्षकांनी दखल घेत त्याला विजेतेपद बहाल केले. कठोर मेहनत, सततचा सराव आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर त्याने हे यश मिळवले असून, राज्य पातळीवरही तो असाच दमदार प्रदर्शन करेल असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. अवधूतच्या या चमकदार कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे मनापासून अभिनंदन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## थोडक्यात

### वाहतूक पोलिसांचा प्रामाणिकपणा ; दागिन्यांची पिशवी केली परत



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** कळंबोली वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणामुळे दुचाकी वरून पडलेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग संबंधित व्यक्तींशी संपर्क साधून ती त्यांना परत करण्यात आल्याने मलबारी कुटुंबीयांनी कळंबोली वाहतूक पोलिसांचे आभार मानले आहेत. स्वप्नील श्याम मलबारी रा खारघर हे आपल्या कुटुंबियांसह वाहनावरून कळंबोली सर्कल येथून जात असताना सोन्याचे दागिने, मोबाईल फोन व रोख रक्कम असलेली बॅग ती त्या परिसरात खाली पडली परंतु ही बाब त्यांच्या लक्षत आली नाही आणि ते पुढे निघून गेले. दरम्यान तेथे कर्तव्यावर असणारे पोळीला हवालदार भोईर व पोलीस शिपाई राठोड यांच्या निदर्शनास ही बॅग आली. ताडोबाने सदर बॅग त्यांनी ताब्यात घेऊन मलबारी कुटूंबियांशी संपर्क साधून आतील गोष्टींची शहानिशा करून सदर बॅग मलबारी कुटुंबियांना परत केली. यावेळी मलबारी कुटुंबीयांच्या डोळयात आनंदाश्रू उभे राहिले व त्यांनी वाहतूक शाखेचे आभार मानले आहेत.

### इसम बेपत्ता



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** घरातून कोणास काही एक न सांगता घरा बाहेर पडलेला इसम आद्यपही घरी परत न आल्याने तो हरवल्याची तक्रार उलवे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. आरीफुल हक खोसचाँद शेख (वय ३३ वर्ष) असे या इसमाचे नाव आहे. त्याची उंची ५.७ इंच, बांधा मजबुत, रंग काळा, चेहरा- गोल, केस काळे, नाक लांब, डोळे काळे, पायात स्पिलर, अंगात-फिकट निळया रंगाचा शर्ट व काळी पॅन्ट असून त्याला हिंदी भाशा बोलता येथे या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार विकी लॉजरेस यांच्याशी संपर्क साधावा



**पनवेल मधील प्रसिद्ध पोटे मसाले कुटुंबियातील निलेश पोटे यांचे सुपुत्र प्रेम यांचा विवाह नुकताच सोनिया सर्वेश दलाल हिच्याशी संपन्न झाला. यावेळी वधू वरांना शुभेच्छा देताना आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, निलेश पाटील, शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, संजय जैन, पत्रकार संजय कदम, राकेश पोटे आदी मान्यवर**

**( दैनिक युवक आधार )**

### आनंदपुर येथील ग्रामपंचायतीवर महिला राज!, पण सरपंचपतीची लुडबुड चारणार नाही-दादासाहेब सोनवणे सामाजिक कार्यकर्ते आनंदपुर



**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा विभाग पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे : पैठण** तालुक्यातील आनंदपुर,शृंगारवाडी या ग्रुप ग्राम पंचायत निवडणुक आरक्षण सोडत एससी महिलेला जागा सुटली असुन यात ग्रामपंचायतवर महिला सरपंच होणार आहे.हि आनंदाची बाब असुन यात मात्र सरपंच पतीराजची लुडबुड चालणार नाही.जर सरपंचपती ग्रामपंचायतमध्ये लुडबुड करण्याचा हेतु कदापी खपुन घेतले जाणार नाही.अशी स्पष्ट भुमिका आनंदपुर येथील सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब सोनवणे यांनी दैनिक युवक आधार प्रतिनिधींनीशी बोलतांना मांडली आहे.

### चंद्रमोहन विष्णु रानडे यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) उपाधी प्रदान !!




**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी):** वॉशिंग्टन डी.सी. (यू.एस्) येथील नामांकित Ceder_brook University कडून मानवी आभामंडळ व विश्लेषण या विषयावरील विशेष संशोधन कार्यासाठी श्री.चंद्रमोहन विष्णु रानडे यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) उपाधी नुकतीच दि. ९ नोव्हेंबर रोजी प्रदान करण्यात आली.चंद्रमोहन वि.रानडे हे गेल्या २८ वर्षांपासून "आभामंडळ(AURA) तसेच रेकी व शैक्षणिक क्षेत्रात काम करीत आहेत. त्यांचा आभामंडल या क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव, प्रशिक्षण व अभ्यास आहे."ह्यूमन ऑरा अँड अँनालिसीस" यावर संशोधन प्रबंध लिहिला आहे. त्याकरिता त्यांना ही सदर पी.एच्.डी. प्रदान करण्यात आली आहे.

# ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलचे 13 वे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी.जोगेंद्र सोमवंशी :** लातूर, दि. १५ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूलचे १३ वे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे डॉ. विठ्ठल लहाने - अध्यक्ष लहाने हॉस्पीटल, श्री शिवराज मोटेगावकर - संचालक आर. आर. सी., तुकाराम पाटील- द्वारकादास श्यामकुमार, श्री राम बोरगावकर - अध्यक्ष संगीत महाविद्यालय, डॉ. हनुमंत किनीकर - अध्यक्ष, सह्याद्री हॉस्पिटल लातूर, अभिषेक शिंदे पोलीस निरीक्षक- शिवाजीनगर पोलिस स्टेशन, यांच्या हस्ते नटराज पूजन व दीपप्रज्वलन करून झाली.



प्रमुख पाहुणे डॉ. किनीकर यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत कला जपणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगत आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात देशभक्तीपर गीत, सांस्कृतिक गीत, साउथ इंडियन गीत, महाभारत, छावा नाटिका अशा विविध कलाप्रकारांचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. इयत्ता ७ वी व ८ वी तील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वागत गीताने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'वडिलांचा संघर्ष' या नाटिकेने उपस्थित पालक व पाहुण्यांची मने जिंकली.तसेच भारतीय सेना, खेळ, नटरंग, 'वासुदेव आला', 'आरंभ है प्रचंड है', 'सुनो गौर से दुनियावालों' यांसारख्या लोकप्रिय व देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांनी हृदयस्पर्शी / मोहक नृत्य सादर केले. स्नेहसंमेलन दोन सत्रांमध्ये पार पडले. पहिल्या सत्रात एलकेजी ते ५ वी च्या विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले. या सत्राचे उद्घाटन मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिव सौ. अलका आगलावे व संस्थापिका सौ. संजीवनी बिरादार उपस्थित होत्या. कार्यक्रमावेळी संस्थेचे डायरेक्टर सुयश बिरादार, सुजित बिरादार, प्राचार्य आम्रपाली सरवदे, प्रशासकीय अधिकारी धम्मानंद सरवदे, उपप्राचार्य किरण देशपांडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख रामेश्वरी कदम, शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे सहशिक्षक श्री वाघंबर उबाळे यांनी केले तर आभार विद्यालयाचे सीईओ श्री धम्मानंद सरवदे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षेकत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## गुणगौरव समारंभ आणि " अजब माणसांची दुनिया " कविसंमेलन फारच उत्तम- प्राचार्य साहेबराव ओव्होळ

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :** उरण कोमसाप मधुबन कट्ट्याची दर महिन्याची १७ तारीख बहारदार असते,त्यांचा प्रत्यय प्रेक्षकांनी अनुभवलेला आहे परंतु दोन प्रभावी व्यक्तिमत्त्वांचा जीवन गुणगौरव समारंभ प्रेरणादायी वाटले.एक अलिबाग येथील जीवन दत्ताराम पाटील यांनी १३० प्रेतांना अग्नी देण्याचे पुण्यकर्म केले आहे आणि दुसऱ्या माजी मुख्याध्यापिका वंदना मनोहर म्हात्रे ,ज्यांनी सेवा काळात अनेकांना मदतीचा हात दिला. तसेच " अजब माणसांची दुनिया " या विषयावरचे कविसंमेलन फारच उत्तम झाले.असे विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष या.प्राचार्य साहेबराव ओहोळ यांनी मांडले.यावेळी साहित्यरत्न रायगडभूषण प्रा एल बी पाटील, चंद्रकांत मुकादम, निळवर्ण दत्ताराम,भुवनेश पाटील देविदास पाटील,सुरेश शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मच्छिंद्र म्हात्रे आणि सूत्रसंचालन संजय होळकर यांनी सुरेख केले. कविसंमेलन रंगले ते " अजबदुनिया माणसांची " या विषयावर सादर केलेल्या दर्जेदार कवितांनी.



म.का.म्हात्रे,अजय शिवकर, रामचंद्र म्हात्रे,मारुती तांबे,संजीव पाटील,न.ग.पाटील अनामिका राम,हेमंत पाटील, दर्शन मोकल,संपदा पाटील, रंजना केणी .रायगडभूषण प्रा.एल.बी.इत्यादी कवींनी कविता सादर केल्या. ज्येष्ठ नागरिक देवबंद कोळी,सुरेश शिंदे,बी. एस. वैशंपायन,शंकर पाटील,भिका सयाजी,सुरेश गायकवाड, रामचंद्र जोमा या ज्येष्ठांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

## श्रीवर्धनमध्ये पर्यटन तेजीत, पण अरुंद रस्त्यांनी ठप्प वाहतूक; रस्ता रुंदीकरणाची मागणी जोरात"

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित :** समुद्रकिनारा, निसर्गसौंदर्य आणि इतिहास यामुळे पर्यटकांची पहिली पसंती असलेल्या श्रीवर्धनमध्ये पर्यटन उद्योग भरभराटीत आहे. मात्र शहरातील अरुंद रस्ते आणि वाहनतळांच्या अभावामुळे वाहतूक कोंडीचे संकट अधिकच गडद होत चालले आहे.

विशेषत: आठवड्याच्या शेवटी आणि सुट्टीच्या दिवशी शहर पर्यटकांनी खचाखच भरते, पण त्याच वेळी वाहतूक पूर्णपणे ठप्प होण्याची परिस्थिती निर्माण होते. गाड्यांच्या लांबच लांब रांगा, रस्त्याच्या कडेला केलेली अवैध पार्किंग आणि अरुंद मार्गांमुळे पर्यटकांसोबतच स्थानिक नागरिकांचाही प्रवास त्रासदायक बनतो.

धोक्याची बाब म्हणजे, या कोंडीत ॲम्ब्युलन्ससारख्या आपत्कालीन सेवा देखील अडकत असल्याचे प्रकार वेळोवेळी समोर आले आहेत. त्यामुळे जीवितास धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.नागरिक, व्यावसायिक आणि येणारे पर्यटक यांनी रस्ता रुंदीकरण,



नियोजनबद्ध पार्किंग व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणात सुधारणा करण्याची मागणी आता जोरात केली आहे. वाढत्या पर्यटनाला योग्य पायाभूत सुविधा मिळाल्या नाहीत, तर श्रीवर्धनची ओळख आणि पर्यटकांचा अनुभव दोन्ही बाधित होण्याची शक्यता असल्याचे मत व्यक्त होत आहे.पर्यटन वाढीस गती देण्यासाठी आणि नागरिकांचा त्रास कमी करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

## सोयगाव तालुक्यात मका खरेदी केंद्र सुरु करण्यासाठी काँग्रेस तालुकाध्यक्ष राजू भाऊ काळे यांचा पुढाकार

**दैनिक.युवक आधार**

**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे :** शासकीय मका खरेदी लवकरच सुरू होणार.परिसरातील व तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या मक्याच्या शासकीय खरेदीला सुरुवात व्हावी यासाठी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष.राजू भाऊ काळे यांनी पुढाकार घेत महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.मका खरेदी उशिरा सुरू झाल्यामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांची समस्या लक्षात घेऊन राजू भाऊ काळे यांनी जालना लोकसभेचे खासदार कल्याणराव काळे यांचीशी थेट मोबाईल दारे संपर्क साधला. परिस्थितीची गंभीर दखल घेत खासदार कल्याणराव काळे यांनी तात्काळ प्रतिसाद देत खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी संबधित



विभागाशी चर्चा केली व आवश्यक कार्यवाहीस गती दिली.यामुळे सोयगाव तालुक्यातील शेतकरी वर्गात समाधानाची भावना निर्माण झाली असून,राजू भाऊ काळे यांचा हा वेळेवर केलेला पुढाकार व खासदार साहेबांचा झटपट निर्णय शेतकऱ्यांमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे.लवकरच सोयगाव तालुक्यात मका खरेदी केंद्र सुरू होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## युवा नेतृत्वाला मोठा सन्मान – गोकुळभाऊ झिरवाळ यांची आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकपदी निवड"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी कृष्णा गायकवाड, पिंपळगाव बसवंत :** दिंडोरी-पेठ तालुक्याच्या सामाजिक, शैक्षणिक व मूलभूत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरू शकणारा ऐतिहासिक निर्णय म्हणून युवा नेतृत्व मा. गोकुळभाऊ झिरवाळ यांची आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकपदी भरघोस मतांनी निवड झाल्याची गौरवशाली नोंद झाली आहे. ही निवड महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री तसेच अन्न व औषध प्रशासन मंत्री नामदार मा. नरहरी झिरवाळ साहेब यांच्या दूरदर्शी नेतृत्व व प्रगल्भ मार्गदर्शनाखाली साकारली असल्याचे मानले जात आहे.

निवड जाहीर होताच दिंडोरी-पेठ परिसरात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिक, युवा वर्ग आणि सामाजिक संस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

या निवडीमुळे युवा शक्ती, प्रगतिशील



विचारसरणी व जबाबदार नेतृत्वाला राज्यस्तरावर योग्य स्थान प्राप्त झाल्याचे स्पष्ट संकेत दिसून येत आहेत.

यासंदर्भात आयोजित सत्कार सोहळ्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिंडोरी तालुका अध्यक्ष मा. श्री. नामदेव देवराम गावित तसेच भवानी लान्स व नर्सरीचे संचालक मा. श्री. विजय बोराडे यांनी फुलगुच्छ व शाल अर्पण करून मा. गोकुळभाऊ झिरवाळ यांचा सन्मानपूर्ण सत्कार केला. उपस्थितांनी यावेळी त्यांच्या नेतृत्वगुणांची, सामाजिक कार्याची व विकासात्मक दृष्टीची प्रशंसा केली.

या निवडीमुळे आदिवासी भागात विकासाच्या नव्या दिशा, संधी व योजनांना गती मिळेल, रोजगार, आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा आणि सर्वांगीण प्रगतीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले जातील, असा विश्वास उपस्थित मान्यवर व नागरिकांनी व्यक्त केला आहे.

या यशानंतर बोलताना मा. गोकुळभाऊ झिरवाळ यांनी "आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी प्रामाणिक, पारदर्शक आणि परिणामकारक कार्य करण्याची हमी देत विकासाचा नवा पर्व सुरू करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचं विजयी होणार - माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत पनवेल तालुक्यात महाविकास आघाडीच विजयी होणार असे प्रतिपादन शिवसेना नेते व माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी मोर्बे येथे आयोजित पनवेल ग्रामीण विभागातील शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी व युवासेना पदाधिकारी यांच्या बैठकीत केले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल ग्रामीण विभागातील शिवसेना पदाधिकारी, महिला आघाडी व युवासेना पदाधिकारी यांची बैठक शिवसेना नेते तथा माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये व शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड-पनवेल शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली सहकार द्वारका मोर्बे येथे पार पडली. यावेळी शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, जिल्हा




संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, जिल्हा सहसंपर्क प्रमुख अनिल चव्हाण, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, महानगर समन्वयक दिपक घरत, महानगर प्रमुख अवचित राऊत, तालुका प्रमुख ज्ञानेश्वर बडे, तालुका संघटक रामदास पाटील, युवासेना जिल्हाधिकारी पराग मोहिते, विधानसभ अधिकारी अजय पाटील, मनोज कुंभारकर, उपतालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, बबन फडके, विभाग प्रमुख दत्ता फडके, शशी भगत, विशाल भोईर, धनंजय पाटील, महिला आघाडी उपजिल्हा संघटिका रेवती सकपाळ, विधानसभा संघटिका सुजाता कदम, तालुका संघटिका अनीता डांगरकर, सरपंच सौ. रेणुका गायकर यांच्या सह शाखा प्रमुख उपशाखा प्रमुख व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांची आढावा सभा

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** स्वच्छ भारत मिशन आणि जल जीवन मिशन अंतर्गत प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी तालुक्यातस्तरावर काम करणारे अभियंता आणि गट समन्वयक तथा बी आर सी सी आर सी यांची सविस्तर आढावा बैठक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी (दि .१४) घेतली. बैठकीला जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक धैर्यशील पाटील आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे यांची उपस्थिती होती. सुरुवातीला १५ व्या वित्त आयोग अंतर्गत जलजीवन मिशनची किती कामे बाकी आहेत आणि किती निधी खर्च झाला. याबाबतचा तालुकानिहाय आढावा घेण्यात आला. जी कामे प्रलंबित आहे ती तत्काळ मार्गी लावून पंधरावा वित्त आयोगाचा निधी खर्च करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या.

**सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन कामाचे बिल काढण्याची निर्देश**

सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापनाचे कामे पूर्ण झाली आहेत परंतु मोजमापन पुरिस्केत नोंद न घेतल्यामुळे त्यांचे देयक काढण्यात अडचण



येत आहे. यामुळे अनेक गावांमध्ये सांडपाणी व घन कचरा व्यवस्थापनाची कामे पूर्ण होऊन सुद्धा देयके प्रलंबित आहेत.याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व अभियंते यांना एम.बी रेकॉर्ड करून तात्काळ बिल सादर करण्याचे निर्देश दिले यावेळी वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक शौचालय याबाबत तालुका स्तरावर तसेच जिल्हास्तरावर प्रलंबित असलेल्या कामे व निधी खर्चबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. पुढील आठ दिवसात प्रलंबित राहिलेले कामे पूर्ण न झाल्यास आणि निधी अखर्चित राहिल्यास संबंधितावर खडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी अपील चोहान यांनी यावेळी दिले सीईओ चौहान यांनी याबाबत पुढील बैठक सर्व गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांच्यासोबत लावण्याचे निर्देश प्रकल्प संचालक धैर्यशील पाटील यांना दिले.

# पेण नगरपरिषद निवडणूक भाजप, – राष्ट्रवादी काँगेस व मित्र पक्षाचे निर्विवाद वर्चस्वाचे लक्ष!

**दैनिक युवक आधार**

**पेण दीपक लोके** : भाजप राष्ट्रवादी काँगेस व मित्रपक्ष या महायुतीच्या उमेदवारांनी आज ढोलताशांच्या गजरात भव्य शक्तीप्रदर्शन करीत रॅली काढून आज नगरपरिषद निवडणूककरिता नगराध्यक्ष पदासोबत नगरसेवक पदासाठी २४ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तानाजी शेजाळ यांच्याकडे दाखल केले असून यावेळी भाजप समर्थकांनी एकच जल्लोष केला. आज शेवटच्या दिवशी महायुतीच्या उमेदवारांनी आमदार रविशेठ पाटील व खासदार धैर्यशिल पाटील यांच्या उपस्थितीत कोल्हटकर वाडा येथील गणपती मंदिरात गणेशाचे दर्शन घेतले. यावेळी बोलताना



आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले कि, येत्या नगरपरिषद निवडणुकीसाठी महायुती सज्ज झाली असून आज पेणकरांनी मोठ्या संख्येने दाखविलेल्या उपस्थितीवरून विरोधकांचा सुपडा साफ होईल असे त्यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले कि, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पेणला नेहमे झुकते माप देऊन मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे काम मागच्या काळात केले. यामुळे गेल्या १० वर्षात नगराध्यक्षा प्रितम पाटील व त्यांच्या सहकार्यांनी केलेली विकास कामांच्या बळावर जनता आमच्या पाठीशी ठाम आहे असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी खासदार धैर्यशिल पाटील यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नां उत्तर देताना सांगितले कि, महायुतीच्या रॅलीला पेणच्या जनतेने दिलल्या प्रतिसादावरून २४ नगरसेवक व १ नगराध्यक्ष असे महायुतीचे २५ उमेवार निवडून येणार हि काळ्या दगडावरची रेघ आहे. प्रत्येक उमेदवारांची निवडणूक लढण्याची इच्छा असते ज्यांनी बंडखोरी केली त्यांना विश्वासात घेण्याचे काम आम्ही करीत असून राजकारणात तोडायचे नसते जोडायचे असते ही भूमिका आमची असणार आहे. शेवटच्या दिवशी मोठ्या संख्येने महायुती, नगरविकास आघाडी, आम्ही पेणकर आघाडी, शिवसेना शिंदे गट, मनसे , अपक्ष उमेदवार यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

# ऑपरेशन लोटस "मुळे मंत्रिमंडळ बैठकीवर शिवसेना मंत्र्याचा बहिष्कार

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( नासिकेत पानसरे ) :** भाजपकडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे "ऑपरेशन लोटस" करीत असल्याने यांचा वाद आज मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी एका नाराजी नाट्यातून दिसून आला. शिवसेनेच्या मंत्र्यांनी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकल्याने एकच राजकीय खळबळ उडाली.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे वगळता सेनेचे सर्वच मंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात ठाण मांडून होते.अखेर मुख्यमंत्र्यांशी चर्चा संपल्यावर या नाराजी नाट्याला पूर्णविराम मिळाला.

भाजपमधील वाढत्या इनकमिंगवर शिंदेसेनेकडून नाराजी व्यक्त करण्यात आली. शिंदेसेनेच्या माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांना भाजप गळाला लावत असल्याचा आक्षेप शिंदे यांच्या मंत्र्यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे व्यक्त केला. त्यावरुन फडणवीस यांनी शिंदे यांच्या मंत्र्यांना चांगलेच सुनावलं. फोडाफोडीची सुरुवात तुम्ही उल्हासनगरात केली, अशा शब्दांत फडणवीस यांनी सेनेच्या मंत्र्यांना झापलं.असल्याचे समजते.सध्या नवीमुंबई,रायगड उल्हासनगर,डोंबिवली येथे भाजपा विरुद्ध एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या प्रश्वभूमीवर जोरदार एकमेकांवर कुरघोडी सुरू आहे.याचा नाराजीचा स्फोट आज अखेर झाला.

निवडणुकीत युतीचा धर्म पाळला जात नसल्याची तक्रार शिवसेनेच्या मंत्र्यांनी आज फडणवीस यांच्याकडे केली. यावेळी त्यांनी सबुरीने घ्यावा. एकमेकांना प्रवेश देवू नका. अशा सूचना केल्या.तुम्ही उल्हासनगरमध्ये जे केले ते आम्ही कल्याण डोंबिवलीमध्ये केले.असे स्पष्ट केले. सध्या भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर अचूक बाण चालवला आहे. त्यांच्या या आक्रमक राजकारणामुळे शिवसेना चांगलीच घायाळ झालेली आहे.

आज एकीकडे शिवसेनेचे मंत्री फडणवीस यांच्याकडे जाऊन भाजपमधील वाढत्या पक्ष प्रवेशांबद्दल नाराजी व्यक्त करत असताना त्याच वेळी चव्हाण मात्र राजू शिंदे यांचं भाजपमध्ये स्वागत करत होते. राजू शिंदे गेल्या वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्या शिवसेनेचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या विरोधात निवडणूक लढले आहेत. २०२९ मध्ये भाजप स्वबळावर लढणार आहे. त्याची तयारी चव्हाण यांनी आतापासूनच सुरु केली आहे का? सध्या अशी चर्चा जोरदार सुरू आहे. शिंदेसेनेचे आमदार असलेल्या मतदारसंघांमध्ये चव्हाण यांनी पुढील निवडणुकीसाठी उमेदवार तयार करण्यास सुरुवात केली आहे असल्याचे बोलले जात आहे.

# पाण्याचा प्रत्येक थेंब शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी योग्य रीतीने वापरला जावा हे प्रमुख ध्येय जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** रब्बी हंगामात उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी योग्य रीतीने वापरला जावा, हे आपलं प्रमुख ध्येय आहे. हवामानातील अधिनिश्चिती चा विचार करता सिंचनाचे नियोजन वेळेवर आणि नीटनेटके करणे गरजेचे आहे. विभागानी समन्वयाने काम करून शेतकऱ्यांना आवश्यक तंत्रिक माहिती आणि मदत वेळेवर उपलब्ध करून द्यावी. माती परीक्षण, पिकांचा कल जाणून घेणे, सिंचन साधनाची दुरुस्ती आणि पाण्याचा पुनर्वापर याकडे विशेष लक्ष दिल्यास उत्पादन क्षमता वाढण्यास मदत होईल. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायद्याचे ठरेल अशी कायदेपद्धती ठेवून सर्व विभागांनी एकत्रपणे प्रभाव कृती आराखडा राबवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

रब्बी हंगाम २०२५-२६ यासाठी सिंचन नियोजन आणि पाण्याच्या उपलब्धतेचा आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर बोलत होते. बैठकीस जलसंपदा विभागाने कार्यकारी अभियंता सुरेंद्र जाधव, कार्यकारी अभियंता कारंजा जेवळीकर,उपकार्यकारी अभियंता निखिल चव्हाण, उपविभागीय अधिकारी नमन डाखोरे, सहाय्यक अभियंता भास्कर वळवी, कृषी उपसंचालक हिना शेख,मुख्यमंत्री फेलो संकेत नरुटे,कनिष्ठ अभियंता अश्विनी राठोड आदी उपस्थित होते. 15 ऑक्टोंबर ते 15 नोव्हेंबर या कालावधीत होणाऱ्या आवर्तपूर्वी कामाचा आढावा घेताना जलसंपदा व कृषी विभागामध्ये समन्वय समिति गठित वाढशसमन्वय समिति गठित करण्याचे ठरविण्यात आले.

# आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा एकनिष्ठ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** राज्यात होणाऱ्या नगरपरिषद व नगर पंचायत निवडणुका या स्थानिक प्रश्नांवर लढल्या जातात. अशा निवडणुकांत पक्षापेक्षा कार्यकर्त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची कामगिरी आणि स्थानिक समाजाशी असलेली नाळ अधिक महत्त्वाची ठरते. याच विचारातून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाने (आंरिमो) पक्ष न पाहता, सच्चे व निष्ठावान कार्यकर्त्यांना समर्थन जाहीर केले असल्याची माहिती राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी पत्रपरिषदेत दिली.

बागडे म्हणाले की, “ही निवडणूक कार्यकर्त्यांच्या हक्काची पावती देणारी असते. समाजाच्या खऱ्या प्रश्नांवर काम



करणाऱ्या, पंगतीत-संगतीत राहणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी मिळायला हवी.”

ते पुढे म्हणाले की, ज्या पक्षांनी आयाराम-गयाराम, परिवारवाद किंवा पैशाच्या जोरावर उमेदवार न देता, जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना तिकीट दिले आहे, अशा उमेदवारांच्या मागे आंरिमो ठामपणे उभा राहील. कार्यकर्त्यांच्या शिफारशीनुसार संबंधित उमेदवारांना समर्थन पत्र देण्यात येईल.

# काँग्रेसकडून नगराध्यक्ष पदाकरीता नंदा म्हात्रे यांचा अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**

**पेण, दीपक लोके :** पेण नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस नंदा म्हात्रे यांनी नगराध्यक्ष पदाकरिता आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी बोलताना काँग्रेस पक्षाचे जिल्हा निरीक्षक यांनी सांगितले की रायगड जिल्ह्याच्या नगरपालिका निवडणुकीमध्ये पेणच्या नगराध्यक्ष पदाचा उमेदवार म्हणून पक्षाने नंदा म्हात्रे यांना जबाबदारी दिली आहे. गेल्या अनेक वर्ष त्यांच्या कामाची माहिती येथील नागरिकांना असल्याने त्यांना जनता भरभरून प्रतिसाद देतील.तर नंदा म्हात्रे या म्हणाल्या की पेण तालुक्यासह शहरातील



गोरगरीब कष्टकरी श्रमजीवी कामगार या वर्गाला न्याय देण्याची भूमिका सातत्याने ठेवली असून त्यांच्या समस्या त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्येक वेळी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या कामांकरीता त्यांच्या हक्काची उमेदवार असल्याने आणि काँग्रेस पक्ष नेहमीच सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याने आपण जनतेच्या मनातील उमेदवार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी काँग्रेस निरीक्षक कांबळे, तालुकाध्यक्ष अशोक मोकल, सूर्यकांत पाटील, संदीप पाटील, आर.जे.म्हात्रे, हिदु कुवारे तसेच पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगराध्यक्षपदासाठी रुचिता राजेंद्र घोरपडे यांचा मोठ्या जल्लोषात शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**

**बदलापूर प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर** : बदलापूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजपा, राष्ट्रवादी,आरपीआय युतीच्या उमेदवार म्हणून रुचिता राजेंद्र घोरपडे यांनी रविवार दिनांक१६नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला.भव्य रॅलीच्या माध्यमातून जोरदार शक्तिप्रदर्शन करीत रुचिता राजेंद्र घोरपडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.बदलापूर पश्चिमकडील रमेशवाडी येथील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करुन रुचिता घोरपडे यांच्या भव्य रॅलीला सुरुवात झाली. तेथून बाजारपेठ ते स्वातंत्र्यवीर सावरकर उड्डाणपूल असे मार्गक्रमण करत रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहचली.तेथे शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून रॅली गांधी चौक मार्गे




कुळगाव-बदलापूर नगरपरिषद कार्यालयात पोहोचली.आणि तेथे रुचिता राजेंद्र घोरपडे यांनी भाजपा, राष्ट्रवादी,आरपीआय युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला.यावेळी भाजपचे ठाणे जिल्हा निवडणूक प्रमुख तथा माजी खासदार कपिल पाटील,स्थानिक आमदार किसन कोरे व परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस कॅप्टन आशिष दामले, भाजपचे ठाणे जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी, यांच्या प्रमुख उपस्थितीत रुचिता घोरपडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले होत.महिलांची संख्याही लक्षणीय होती.माजी खासदार कपिल पाटील, आमदार किसन कथोरे, परशुराम आर्थिक महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांनी रुचिता घोरपडे यांना विजयाच्या शुभेच्छा देऊन नगरपरिषद निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी,आरपीआय युतीच्या विजयाचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# आरक्षण सोडतीला महाराष्ट्र नवनिर्माण सेना व महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा तीव्र विरोध

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल महानगरपालिकेन १७ नोव्हे. २०२५ निवडणूक आयोगाच्या पत्रान्वये काही जागांसाठी पुन्हा आरक्षण सोडत काढण्याचा कार्यक्रम वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित केला होता. मात्र या कार्यक्रमाला महाराष्ट्र नवनिर्माण सेना व महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तीव्र विरोध दर्शविला.

कार्यक्रम सुरू होताच मनसे व महाविकास आघाडीचे प्रतिनिधी व्यासपीठावर जाऊन आरक्षणातील सुरू असलेल्या घोळ व मनमानीविरोधात



जोरदार घोषणाबाजी करीत निषेध नोंदविला. दोन्ही पक्षांनी प्रशासनावर आरक्षण प्रक्रियेबाबत पारदर्शकतेचा अभाव, अचानक बदल व मतदारांना दिशाभूल करणारी कार्यपद्धती केल्याचा आरोप केला. नाट्यगृहातील या आंदोलनामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. नंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत आंदोलनकर्त्यांना खाली उतरण्याची विनंती केली. पक्षांनी प्रशासनाकडे आरक्षण प्रक्रिया नियमबद्ध, पारदर्शक व निष्पक्ष रीतीने पार पाडण्याची मागणी केली आहे.

मनपा अधिकाऱ्यांनी आरक्षण सोडत आयोगाच्या निर्देशानुसार झाल्याचे सांगितले असले तरी विरोधी पक्षांनी हा मुद्दा येत्या निवडणूक वातावरणात अधिक आक्रमकपणे मांडण्याची भूमिका घेतली आहे. या प्रसंगी मनसे शहराध्यक्ष तथा प्रवक्ते श्री. योगेश चिले, शेतकरी कामगार पक्ष शहराध्यक्ष श्री. प्रकाश म्हात्रे, शिवसेना उबाठा महानगराध्यक्ष श्री. अवचित राऊत, कांग्रेस जिल्हाध्यक्ष श्री. सुदाम पाटील, राष्ट्रवादी श. प. चे श्री ननावरे व कार्यकर्ते हजर होते.

# तुर्भे स्टोअर विभागातील गटारकामांची दुर्दशा – नागरिक संतप्त, मनपाविरोधात निषेध

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर रायगड** : तुर्भे स्टोअर, के. के. आर. रोड, लुंबिनी बुद्ध विहार मार्ग परिसरात मागील १५ ते २० दिवसांपासून गटाराचे काम पूर्णपणे ठप्प असून यामुळे स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. अलीकडेच एका लहान मुलीचा उघड्या गटारात पडून गंभीर इजा झाल्याचा प्रकार घडला आहे. या घटनेनंतर नागरिकांमध्ये प्रचंड संताप उसळला आहे.स्थानिक नागरिकांनी तुर्भे विभाग अधिकारी सागर मोरे आणि स्थापत्य विभाग यांच्याकडे प्रश्न उपस्थित केला आहे—“मनुष्यहानी होण्याची वाट बघत आहात का?”नवी मुंबई महानगरपालिका स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या निष्क्रिय कार्यप्रणालीबद्दल नागरिकांनी जोरदार निषेध व्यक्त केला आहे. प्रलंबित गटारकामे नेमक्या कोणाच्या निर्देशावरून थांबवण्यात आली, याबाबत नागरिकांमध्ये संशय असून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. नागरिकांचे



**यासंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की,“लवकरात लवकर प्रलंबित गटारकामे पुर्ण करा; अन्यथा आम्हाला सहाय्यक आयुक्त आणि वॉर्ड ऑफिसवर निषेधार्थ मोर्चा काढावा लागेल.”**
**(ॲड. ज्ञानदीप निकाळजे- उपाध्यक्ष, RPI (A), नवी मुंबई)**

म्हणणे आहे की—कामाच्या ठिकाणी माहिती फलक (बोर्ड) न लावण्यामागे गंभीर गौडबंगाल आहे. अधिकारी वर्ग प्रभागात फिरत नसून, केवळ टक्केवारीत रस असल्याचा आरोपही नागरिकांनी केला. परिसरातील वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी तत्काळ कारवाईची मागणी केली असून संबंधित कामे तातडीने सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# पारवा पोलीस स्टेशनचे नवनियुक्त ठाणेदार हेमंत चौधरी यांचे, सर्व गावातील पोलीस पाटील यांच्या हस्ते स्वागत !



**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटंजी तालुक्यातील पारवा पोलीस स्टेशनमध्ये नवनियुक्त ठाणेदार हेमंत चौधरी यांनी पदभार स्वीकारताच परिसरातील सर्व पोलीस पाटील पदाधिकाऱ्यांनी त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत केले. या स्वागत सोहळ्यात उबदार वातावरण आणि आनंदाचा माहोल पाहायला मिळाला.

पदभार स्वीकारल्यानंतर ठाणेदार हेमंत चौधरी साहेबांनी तात्काळ सर्व पोलीस पाटलांची बैठक घेतली.या वेळी त्यांनी पोलीस पाटील यांच्या भूमिकेचे महत्त्व सांगितले.

गावातील माहिती व सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस पाटील यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यांच्या सहकार्याने परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत ठेवता येईल.”तसेच कोणताही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देण्याचे सूचना त्यांनी दिले.या बैठकीला पारवा पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व गावांचे पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी ठाणेदार साहेबांना सहकार्याची ग्वाही देत त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करण्याची तयारी दर्शवली.पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन ठाणेदार चौधरी यांचे मनापासून स्वागत केले आणि नवीन कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# मतदारांनी वंचित बहुजन आघाडीला साथ द्यावी – ॲड . प्रकाश आंबेडकरांचे थेट आवाहन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** आरएसएस-भाजपचा देशातील राजकीय पक्ष संपवण्याचा अजेंडा असून, या धोक्याला तोंड देण्यासाठी फुले, शाहू, आंबेडकरवादी मतदारांनी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मतदान करावे, असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

आगामी महाराष्ट्रातील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर गंभीर आरोप करत मतदारांना मोठे आवाहन केले आहे.

ॲड. आंबेडकर यांनी त्यांच्या ट्विटमध्ये देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले आहे की, "आरएसएस आणि भाजपचा राजकीय पक्ष संपवणे हा एक अजेंडा आहे आणि बिहारच्या निवडणुकीत ते दिसून आले आहे." त्यांनी अन्य विरोधी पक्षांच्या स्थितीवरही भाष्य केले.

काँग्रेस पक्ष पुन्हा उभा राहू शकेल की नाही, याबाबत शंका आहे. राष्ट्रीय जनता दलाला (RJD) त्यांनी कुटुंबाचा पक्ष म्हणून शिक्का मारला आहे, ज्यामुळे त्याच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे. अशा गंभीर राजकीय पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील निवडणुका होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

फुले-शाहू-आंबेडकरवादी मतदारांना आवाहन राजकीय पक्षांना संपवण्याच्या या कथित अजेंड्याचा मुकाबला करण्यासाठी ॲड. आंबेडकरांनी ठाम भूमिका घेतली. त्यांनी तमाम फुले, शाहू, आंबेडकरवादी, मानवतावादी आणि लोकशाहीवादी मतदारांना थेट आव्हान केले आहे."वंचित बहुजन आघाडी सातत्याने आरएसएस-भाजपा विरोधात लढत आहे. आपल्या सर्वांना आव्हान आहे की, आपण वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला मतदान करा," असे आवाहन त्यांनी केले.

# अणुऊर्जेपासून वीज निर्मिती उपक्रमामध्ये सहभागी होणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** अणुऊर्जेचा वापर ऊर्जा निर्मिती करताना या क्षेत्रात राज्यांचा सहभाग घेण्यासाठी केंद्र सरकार पावलं टाकत आहे. अणुऊर्जेपासून वीज निर्मिती उपक्रमामध्ये सहभागी होणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरत असून स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने महाराष्ट्राने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वर्षा या शासकीय निवासस्थानी महाराष्ट्र राज्य पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (महाजेनको) आणि न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (एनपीसीआयएल) यांच्यात सामंजस्य करार झाला.

या कार्यक्रमाला ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनपीसीआयएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बी. सी. पाठक, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन ('मित्रा')चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, महाजनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी, 'मित्रा'चे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल तसेच महाजेनको व एनपीसीआयएलचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले , देश जलद गतीने विकसित होत आहे आणि विकासाचा मुख्य आधार म्हणजे स्वच्छ व विश्वासार्ह ऊर्जा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ऊर्जा क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी 'स्वच्छ ऊर्जा-सक्षम राष्ट्र' धोरणामुळे अणुऊर्जेतून वीज निर्मितीसाठी राज्यांचा सहभाग वाढविला जाणार आहे.

त्यांनी पुढे सांगितले, आतापर्यंत अणुऊर्जा क्षेत्र हे केंद्र सरकारचे कार्यक्षेत्र आहे. परंतु महाजनको प्रथमच एनपीसीआयएलसोबत या उपक्रमात सहभागी होत आहे. हा सामंजस्य करार अत्यंत योग्य वेळी झाला आहे. डेटा सेंटरचे सर्वात महत्त्वाचे इंधन म्हणजे स्वच्छ ऊर्जा आणि त्यासाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र ही देशाची 'डेटा सेंटर कॅपिटल' बनत आहे. जवळपास ५०-६०% डेटा सेंटर क्षमता महाराष्ट्रात असून ती सातत्याने वाढत आहे, असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एनपीसीआयएलच्या या क्षेत्रातील नावलौकिक आणि अनुभवाचा फायदा महाराष्ट्रासाठी होईल. राज्य सरकार या प्रकल्पात पुढाकार घेऊन सक्रिय राहील आणि आवश्यक ते सर्व सहकार्य राज्य शासन देईल. महाजनको, ऊर्जा विभाग, मित्रा यांनी या दृष्टीने टाकलेले पाऊल हे महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रातील एक ऐतिहासिक महत्वपूर्ण घटना ठरत आहे" असा अभिमानास्पद उल्लेख मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला

यावेळी महाजनकोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. एनपीसीआयएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक बी. सी. पाठक यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी एनपीसीआयएलचे संचालक (तांत्रिक) बी. राजेश, अतिरिक्त संचालक जितेश अरोरा, प्रतीक अग्रवाल, नितीन जावळे, सल्लागार बी. बी. एस. शेखर , संचालक प्रकल्प एन. के. मिठा , तसेच महाजनकोचे संचालक (वित्त) मनीष वाघेरकर, संचालक (ऑपरेशन) संजय मारुडकर, कार्यकारी संचालक (प्रकल्प) राजेश पाटील उपस्थित होते.

**२०४७ पर्यंत स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी रोडमॅप**

सध्याच्या वीज निर्मिती तंत्रज्ञानामध्ये पारंपारिक जीवाश्म इंधन आणि नैसर्गिक स्रोतांसह पर्यावरणीय परिणाम करणारे घटक आहेत. जीवाश्म इंधन (कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू) हे जागतिक विजेचे प्रमुख स्रोत राहिले आहेत, परंतु त्यांच्या वापरामुळे हवा आणि जल प्रदूषण, पॉवर प्लांट उत्सर्जनामुळे होणारे वातावरणातील परिणाम, संसाधनांचा ऱ्हास व कचरा विल्हेवाट यातील धोके समोर आलेले आहेत.

वीज निर्मिती तंत्रज्ञानमध्ये अणुऊर्जेसह सौर आणि पवन यासारख्या अक्षय स्रोतांचे वर्चस्व वाढत आहे. यामध्ये प्रामुख्याने अक्षय ऊर्जा तंत्रज्ञानाची जलद वाढ, ऊर्जा साठवणुकीचे एकत्रीकरण आणि विकेंद्रित निर्मिती आणि स्मार्ट ग्रिड तंत्रज्ञानाचा विस्तार यांचा समावेश आहे.

भारताचे २०४७ पर्यंत "३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था" बनण्याचे उद्दिष्ट आहे, ज्यासाठी ऊर्जा क्षेत्रात मोठे बदल आवश्यक असून. वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी आणि "२०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जन" साध्य करण्यासाठी, कमी जीवनचक्र सीओ२ उत्सर्जन होईल. २४ तास विद्युत निर्मितीमुळे अणुऊर्जा महत्त्वाची भूमिका बजावेल अशी अपेक्षा आहे.

देश ८,८८० मेगावॅट स्थापित क्षमतेसह सात ठिकाणी २५ अणुभट्ट्या चालवतो. ८ अणुभट्ट्या बांधकामाधीन आहेत, ज्यामध्ये ५०० मेगावॅटचा प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर अणुभट्टीचा समावेश आहे. दहा अतिरिक्त अणुभट्ट्यांमध्ये सात हजार मेगावॅट नियोजन होत आहे. यासाठी केंद्र सरकारने लघु मॉड्यूलर अणुभट्टी (एसएमआर) विकासासाठी २० हजार कोटी रुपये निधी तरतूद केली आहे.

२०४७ पर्यंत औद्योगिक उत्पादन – विशेषतः स्टील, सिमेंट आणि ॲल्युमिनियममध्ये झपाट्याने वाढ होण्याची अपेक्षा आहे. अणुऊर्जा प्रकल्प उच्च प्लांट घटकांसह आणि कमीत कमी व्यत्ययांतून सतत कार्यरत राहून बेस लोड पॉवर स्टेशन म्हणून काम करतात.

## आधार कार्ड नागरिकत्वाचा नव्हे फक्त ओळखीचा पुरावा; ईसीआयचा सुप्रीम कोर्टात पुनरुच्चार

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :** आधार कार्डचा वापर केवळ मतदार यादीत समावेश करू इच्छिणाऱ्या अर्जदारांची ओळख पडताळण्यासाठी केला जात आहे, नागरिकत्वाचा पुरावा म्हणून नाही, याचा पुनरुच्चार भारतीय निवडणूक आयोगाने (ईसीआय) सर्वोच्च न्यायालयासमोर शनिवारी केला.

**आधार वापर रोखावा**

नवीन मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म ६ मध्ये जन्मतारखेचा पुरावा म्हणून आधार कार्ड वापरण्याविरुद्ध निर्देश देण्यात आले आहेत. आधारचा वापर ओळख पडताळणीपुरता मर्यादित करावा आणि फॉर्म-६ अर्जांमध्ये जन्मतारखेचा पुरावा म्हणून त्याचा वापर रोखावा, अशी मागणी करणारी याचिका अश्विनी कुमार उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. यावर निवडणूक आयोगाचे सचिव संतोष कुमार दुबे यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

**फॉर्म ६ मध्ये सुधारणा**

निवडणूक आयोगाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, लोकप्रतिनिधी कायदा, १९५० च्या कलम २३(४) नुसार आधार फक्त ओळखीचा पुरावा म्हणून वापरला जात आहे. निवडणूक कायदे (सुधारणा) कायदा, २०२१ द्वारे, मतदार यादीतील डेटा आधार इकोसिस्टमशी जोडण्यासाठी आरपी कायद्याच्या कलम २३ मध्ये सुधारणा करण्यात आली होती. वेगवेगळ्या ठिकाणी एकाच व्यक्तीच्या अनेक नोंदणीस प्रतिबंध करणे हा यामागील उद्देश आहे. या दुरुस्तीच्या आधारे, १७ जून २०२२ पासून फॉर्म ६ मध्ये देखील सुधारणा करण्यात आली आहे.

**ओळखीचा पुरावा**

सर्वोच्च न्यायालयाने ८ सप्टेंबर २०२५ रोजी बिहार एसआयआर प्रकरणात मतदार नोंदणी कागदपत्रांपैकी एक म्हणून आधारचा वापर करण्यास परवानगी देताना स्पष्ट केले आहे की, मतदार यादीतून समावेश किंवा वगळण्याचा निर्णय घेताना आधारचा वापर फक्त ओळख पडताळणीसाठी केला जाऊ शकतो.

न्यायालयाच्या निर्देशानंतर, निवडणूक आयोगाने ९ सप्टेंबर २०२५ रोजी सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना बिहार राज्याच्या सुधारित मतदार यादीत समावेश किंवा वगळण्याच्या उद्देशाने आधार कायदा, २०१६ च्या कलम ९ आणि आरपी कायदा, १९५० च्या कलम २३(४) नुसार नागरिकत्वाचा पुरावा म्हणून नव्हे तर ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड वापरण्यासाठी सूचना जारी केल्या होत्या.

## कृषी उत्पन्न बाजार समितीत कबुतरांचा उपद्रव; धान्याचं मोठं नुकसान

**दैनिक युवक आधार**

**अमरावती :** मुंबईत कबुतरखान्यांचा (Pigeons) विषय गाजत असताना आता अमरावतीत देखील कबुतरांचा त्रास वाढला आहे. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत कबुतरांचा थवा प्रचंड उपद्रवी ठरतोय. हजारोच्या संख्येत असणारा कबुतरांचा थवा बाजारात उघड्यावर ठेवलेल्या पोत्यांमधून सोयाबीन, हरभरा, तूर, मका अशा धान्यावर रोज ताव मारत असून शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीत शेडमध्ये आणि शेडच्या बाहेर सोयाबीन, मका यांची पोती हजारोच्या संख्येत ठेवलेल असतात. कबुतरांचा थवा झेप घेऊन पोत्यांना टोच्या मारत पोत्यांमधील धान्य फस्त करतात. एकाचवेळी हजारो कबुतरं धान्यांच्या



पोत्यावर तुटून पडत असल्यानं धान्याचं मोठं नुकसान होत आहे. "या परिसरात दीड दोन लाख कबुतरं असून दिवसाला क्विंटलभर धान्य ही कबूतरं फस्त करत असावीत असा अंदाज धान्य अडते दिनेश सोनोने यांनी व्यक्त केला. परिसरात उडणाऱ्या कबुतरांमुळं त्यांची विष्ठा हवेतून वातावरणात पसरते. यामुळं धान्य खराब होतं आणि अनेक मजुरांना आजार होत आहेत," असं दिनेश सोनोने म्हणाले.कृषी उत्पन्न बाजार समितीत १८ वर्षांपासून मदतनीस म्हणून काम करणारे रमेश जायले यांना श्वसनाचा त्रास जडलाय. उपचारासाठी सतत दवाखान्यात जावं लागतं. कबुतरांमुळं हा त्रास सुरू झाल्याचं डॉक्टरांनी त्यांना सांगितलं. बाजार समितीमधल्या कबुतरांचा त्वरित बंदोबस्त व्हावा अशी मागणीही त्यांनी केलीय."कबुतर हे मानवासाठी धोकादायक आहेतच, मात्र इतर पक्षांनाही या कबुतरांचा भरपूर त्रास आहे. आता मुंबई, पुण्यासारखी फ्लॅटसंस्कृती अमरावतीसारख्या शहरात वाढली.

मोठ्या इमारतींवर कबुतरांना सहज राहायला जागा मिळते. एसीच्याजवळ ते राहतात. कबुतरांच्या विष्ठेचा दुर्गंध हा एसीच्या हवेतून घरात पसरतो. हे आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. कबुतरांमुळं इतर पक्षी परिसरात वावरू शकत नाहीत.

## शिरूरआनंतपाळ तालुक्यात एकाही भाजपा कार्यकर्त्यांनी पक्ष सोडला नाही

**दैनिक युवक आधार**

**प्रशांत तांबोळकर**

**शिरूरआनंतपाळ :** भारतीय जनता पक्षाला शिरूरआनंतपाळ तालुक्यात बहुसंख्य समाज असुन भाजपाचे आ.संभाजीभैया पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवुन एकाही कार्यकर्त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली नसल्याचे भाजपा तालूकाअध्यक्ष माधवराव बिरादार यांनी सांगितले. शिरूरआनंतपाळ तालुक्यातील प्रत्येक गावाला मिळणारा आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा आमदार फंडातुन पानंदरस्ते, शिवरस्ते गावातील नाली गट्टारीचे कामे, पाणी पुरवठा नळयोजना आरोग्य सेवा, गोरगरिब सामान्य नागरिकांना मिळणारी मदत पाहुन कार्यकर्ते आनंदात आहेत. त्यामूळे कोणताच कार्यकर्ता भाजपाला सोडून



जात नाहीत. मागील आठ दिवसापुर्वी सोशलमीडीयावर शिरूरआनंतपाळ तालुक्यात भाजपाला खिंडार पडले असुन शेकडो कार्यकर्ते कॉग्रेस पक्षात प्रवेश केल्याचे काही दैनिकात प्रसिध्द झाले होते. परंतु एकही कार्यकर्ता पक्ष सोडलेला नसल्याचे शिरूरआनंतपाळ भाजपा ता.अध्यक्ष माधवराव बिरादार यांनी सांगितले.

## बाइक चोरली पण नाकाबंदीत सापडली; तळोजा वाहतूक पोलिसांची कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** तळोजा वाहतूक पोलीस हद्दीमध्ये वाहतूक नियमन करीत असताना एका दुचाकी चालकाला थांबवण्याचा प्रयत्न केला असता दुचाकी चालक पळून गेला. यावेळी तो चालवत असलेली दुचाकी चोरीची असल्याचं समोर आलं. व मालकाच्या ताब्यात दुचाकी दिली. याबद्दल दुचाकी मालकाने वाहतूक पोलिसांचे वाहन मालकाने आभार मानले.

मिळालेल्या माहितीनुसार तळोजा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस पोहवा डावकरे



व पोशी देवकते हे आरएएफ सिग्नल येथे वाहतुकीचे नियमन करीत होते.


यावेळी पनवेच्या दिशेने आलेली एक दुचाकी MH 24 AM 6873 या दुचाकीवरील चालक व त्याच्या पाठीमागे बसलेल्या इसमाची हालचाल ही वाहतूक पोलिसांना संशयितरित्या वाटली. या दरम्यान देवकाते व डावकारे यांनी त्या दुचाकी चालकांना थांबवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या दोघांनी ती मोटारसायकल जागेवरच सोडून पळून गेले. यावेळी ही माहिती वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देऊन त्या दुचाकी ची सर्व माहिती काढली व मूळ मालकाचा शोध लावून दुचाकी मालक ओंकार गायकवाड यांना तळोजा येथे बोलावले व तळोजा पोलीस ठाण्यात ती दुचाकी पुढील कारवाईसाठी देण्यात आली. याबाबत चोरीला गेलेली दुचाकी सापडल्याने मालक गायकवाड यांनी वाहतूक पोलिसांचे आभार मानले.

## पुणे शहरातील कोणता भाग सर्वांत थंड ?; तापमान कधीपासून वाढणार ?

**दैनिक युवक आधार**

**पुणे :** रात्रीच्या किमान तापमानात घट होत असल्याने गेल्या काही दिवसांपासून शहर आणि परिसरात गुलाबी थंडीचा अनुभव येत आहे. यंदाच्या हिवाळ्यातील आतापर्यंतच्या नीचांकी तापमानाची सोमवारी नोंद झाली असून, शहरातील पाषाण परिसर सर्वांत थंड असल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.

निरभ्र आकाश, वातावरणात बाष्पाचा अभाव, उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यात थंडीच्या लाटेसदृश स्थिती निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांत सातत्याने किमान तापमानात घट होत असल्याचे दिसून येत आहे. शहरातही किमान तापमानात घट होत आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी शहरात ठिकठिकाणी शेकोट्या पेटलेल्या दिसत आहेत. मात्र, शहर आणि परिसराचा आढावा घेतला असता काही ठिकाणी तापमानामध्ये फरक असल्याचे दिसून येते.



हवामान विभागाच्या नोंदींनुसार, रविवारी शिवाजीनगर येथे १०.६, पाषाण येथे १०.१, लोहगाव येथे १५.२, चिंचवड येथे १५.३, लवळे येथे १६.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती.

तसेच सोमवारी शिवाजीनगर येथे १०.२, पाषाण येथे ९.८, लोहगाव येथे १५.३, चिंचवड येथे १५, लवळे येथे १६.३, कोरेगाव पार्क येथे १६.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. त्यामुळे शहरात पाषाण परिसर सर्वांत थंड असल्याचे स्पष्ट होत आहे.

## 'सरकार येत्या हिवाळी अधिवेशनात बीज सुधार कायदा आणणार' : कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :**मुंबईमध्ये एसियान सीड काँग्रेस २०२५ चं उद्घाटन करण्यात आलं. हे प्रदर्शन कृषी संशोधकांचा ग्लोबल चौपाल असल्याचा उल्लेख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. "सध्या हवामान बदलाच्या समस्येमुळे शेतकऱ्यांना जास्त गुणवत्तापूर्ण बियाण्याची गरज वाढत आहे. अशा काळात AI, ब्लॉक चैन यासारख्या आधुनिक तंत्रांचा वापर करून निकृष्ट बियाणं शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणार नाही, याची काळजी घेणार आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात बियाणं उद्योगाचा मोठा विकास होत आहे. बियाणं उद्योगाचा शेतकऱ्यांच्या उत्पादनवाढीत मोठी भूमिका आहे," असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केलं आहे. "केंद्र सरकार आगामी हिवाळी अधिवेशनात बीज सुधार कायदा आणणार आहे," अशी माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी यावेळी दिली.

"देशात आणि जगभरात चांगल्या बियाण्यासाठी बियाणं उद्योगानं संशोधन विकासकार्यात किमान १० टक्क्यांपर्यंत गुंतवणूक करावी," असं आवाहन केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी




केलं. "काश्मीर ते कन्याकुमारी दरम्यान असलेल्या १० ॲग्रो क्लायमेटिक झोनमध्ये जगभरात बियाणं निर्यात करण्याची मोठी क्षमता आहे, असं कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले. भारतात अन्नसुरक्षा साधण्यामध्ये बियाणं उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे. केंद्र सरकार येत्या हिवाळी अधिवेशनात बीज सुधार कायदा आणत आहे. या कायद्यामध्ये बियाणं उद्योगानं आपल्या सूचना पाठवाव्यात आणि सरकारला मदत करावी," असं आवाहन कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी यावेळी केलं.

"देशाच्या अन्नधान्य आणि शेती उत्पादनाच्या वाढीमध्ये बियाणं उद्योगाचे मोठे योगदान असल्याचं शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. येत्या काळात शेतीचा उत्पादनखर्च कमी करणं, रसायनांमुळे होणारं शेतीचं नुकसान कमी करणं आणि निर्माण होणाऱ्या अन्नधान्याची पौष्टिकता वाढवणं हे देशासमोरील मोठं आव्हान असून, त्यामध्ये बियाणं उद्योग मोठी भूमिका बजावू शकतो," असं मत शिवराजसिंह चौहान यांनी व्यक्त केलं. "आज भारताचा बियाणं उद्योग वार्षिक अंदाजे ४० ते ५० हजार कोटी रुपयांची उलाढाल करत आहे. बियाणं निर्मीतीमध्ये आपला ५ वा क्रमाक असून बियाणं व्यवसाय वृद्धीमध्ये येत्या काळात बियाणं उद्योगाला फार मोठी संधी दिसत आहे. भारतातल्या बियाणं उद्योगासह संपूर्ण आशियातल्या बियाणं उद्योगासाठी ही परिषद महत्त्वाची आहे," असं शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे.

या परिषदतेत ४० पेक्षा जास्त देशातल्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला. या काँग्रेसमध्ये ४० देशातल्या बियाणं कंपन्यांनी आपले स्टॉल्स लावले आहेत. हे स्टॉल्स काँग्रेसमधील मोठं आकर्षण ठरलं आहे.

वेगवेगळ्या देशातले तज्ज्ञ वेगवेगळ्या देशातल्या पिकांच्या बियांची माहिती घेत आहेत.

त्याचबरोबर बियाणं उद्योजकांमध्ये व्यापार करार देखील होत आहेत.

# ६९० ग्रॅम वजनाच्या अकाली जन्मलेल्या बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी

## खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार - ७८ दिवस एनआयसीयुमध्ये केले उपचार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** प्रसूतिपूर्व गुंतागुंतीमुळे मुदतपूर्व प्रसूती करत अवघ्या २३ व्या आठवड्यात बाळाचा जन्म झाला. जन्माच्या वेळी या बाळाचे वजन केवळ ६९० ग्रॅम होते. मुदतपूर्व जन्म असल्याने त्या बाळाला अनेक शारीरिक समस्या जाणवत होत्या. या बाळावर खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करण्यात आले असून डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर या बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी ठरली.

खारघर येथील मदरहूड हॉस्पिटलने केवळ २३ आठवडे आणि ६ दिवसांच्या गर्भधारणेदरम्यान जन्मलेल्या प्रीमॅच्युअर बाळावर यशस्वी उपचार केले. जन्मतः बाळाचे वजन केवळ ६९० ग्रॅम होते. डॉ.अनिश पिल्लई(नवजात शिशु आणि बालरोग तज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली टिमने योग्य उपचार करत बाळाला असलेला रेस्पीरेट्री सिंड्रोम, श्वसनक्रिया बंद होणे, हृदयात जन्मजात ऱ्हदयविकार(पीडीए), अशक्तपणा, कावीळ आणि कमकुवत प्रतिकारशक्ती यासारख्या अनेक जीवघेण्या गुंतागुंतांवर मात केली.

एनआयसीयूमध्ये ७८ दिवस उपचार घेतल्यानंतर बाळाचे वजन १.९२ किलो इतके वाढले. त्यानंतर बाळ हळूहळू स्तनपानाचा स्विकार करु लागले तसेच योग्य श्वासोच्छवास घेऊ लागले आणि त्यानंतर या बाळाला घरी सोडण्यात आले. सध्या हे बाळ त्याच्या वयानुसार विकासात्मक टप्पे गाठत असून त्याचे वजन २.५६ किलो इतके वाढले आहे.

मुंब्रा येथील रहिवासी रामा (नाव बदलले आहे) * आणि राजेश शिर्के (नाव बदलले आहे) * हे जोडपे त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत करताना खूप आनंदी होते, परंतु जन्मानंतर काही क्षणांतच जेव्हा त्यांच्या नवजात बाळाला जगण्यासाठी संघर्ष करावा लागला तेव्हा त्यांच्या पायाखालची जमीन सरकली. गर्भधारणेतील गुंतागुंतीमुळे बाळ कवलचा(नाव बदलले आहे)* अकाली जन्म झाला त्याला ऑलिगोहायड्रॅमनिओस (गर्भधारणेदरम्यान कमी अम्नीओटिक द्रवपदार्थ) आणि आईला झालेला तापाचा संसर्ग झाला होता. स्थानिक रुग्णालयात जन्मावेळी त्याला ऑक्सिजन सपोर्टवर ठेवण्यात आले. विशेष काळजीसाठी त्याला रुग्णवाहिकेतून मदरहूड हॉस्पिटल, खारघर येथील एनआयसीयूमध्ये सुरक्षितपणे हलवण्यात आले.

बाळाची अविकसित फुफ्फुसं, नाजूक अवयव, संसर्गाचा धोका, हृदयासंबंधी गुंतागुंत, स्तनपानाचा स्विकार न करणे आणि अकाली जन्मल्याने हाडं आणि रक्तप्रवाहासंबंधी समस्या अशा अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागले. त्याला ऑक्सीजन सपोर्ट, सर्फॅक्टंट थेरपी, पॅरेंटरल पोषण, ट्यूबद्वारे आहार, पीडीए व्यवस्थापन, अँटीबायोटिक्स, पूरक आहार आणि योग्य देखरेखीची आवश्यकता होती.

डॉ. अनिश पिल्लई (नवजात शिशु आणि बालरोग तज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई) सांगतात की,* जेव्हा बाळ १ ऑगस्ट २०२५ रोजी जन्माला आले तेव्हा ते अत्यंत नाजूक होते आणि त्यांचे वजन केवळ ६९० ग्रॅम होते. इतक्या लवकर जन्मलेल्या बाळांना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते कारण त्यांचे अवयव पूर्णपणे विकसित झालेले नसतात. बाळाचा श्वासोच्छवास स्थिर करणे आणि संसर्गापासून त्याचे संरक्षण करणे हे आमचे मुख्य आव्हान होते. त्यांची फुफ्फुसं अपरिपक्व होती, म्हणून त्याला ऑक्सीजन सपोर्ट, सर्फॅक्टंट थेरपी आणि नंतर हळूहळू नॉन-इन्व्हेसिव्ह सपोर्टसाठी स्तनपान टाळण्याची गरज होती.

डॉ. अनिश पुढे सांगतात की, जगभरातील आकडेवारी पाहता भारतात अकाली जन्मांची संख्या सर्वाधिक आहे, दरवर्षी जवळजवळ ३.५ दशलक्ष बाळ अकाली जन्म घेतात म्हणजेच १० पैकी १ बाळ अकाली जन्माला येते. अनेक बाळं अशा टप्प्यावर जन्माला येतात जिथे फुफ्फुसं आणि हृदयापासून मेंदू आणि आतड्यांपर्यंत प्रत्येक अवयव अजूनही विकसित होत असतो. यावेळी किरकोळ संसर्ग

देखील जीवघेणा बनू शकतो, म्हणून आमच्या टीमने प्रसंगावधान राखत त्वरीत उपचारास सुरुवात केली. बाळाच्या मेंदूचे स्कॅन, डोळ्यांच्या चाचण्या आणि श्रवण तपासणीचे नियमितपणे निरीक्षण केले गेले आणि कालांतराने सुरुवातीच्या बदलांमध्ये सुधारणा झाल्याचे पाहून उत्साह वाढला. अनेक अडचणींवर मात करत बाळाची प्रकृती हळूहळू सुधारली. बाळाचे फुफ्फुस मजबूत झाले, वेळेवर उपचार केल्याने त्याने ऱ्हदयविकारावरही मात केली, त्याच्या मेंदूतील रक्तस्त्राव थांबला, पोषक आहाराने त्याच्या हाडांमध्ये सुधारणा झाली आणि अखेर बाळ स्तनपान स्विकारु लागले. अत्यंत कमी वजनाच्या बाळांमध्ये आहार आणि वयानुसार वाढ आव्हानात्मक ठरते. त्यांचे आतडे नाजूक असतात आणि त्यामुळे आहार हळूहळू वाढविला जातो. बाळाचे आतड्यांमध्ये जसजसे मजबूत होतात तसतसे त्याच्या आहारात सुधारणा करण्यात आली जेणेकरून त्याला पुरेशा कॅलरीज, खनिज आणि प्रथिने मिळतील. बाळाला ऑस्टियोपेनिया आणि ॲनिमिया देखील झाला, जे सूक्ष्म प्रसूतीपूर्व बाळांमध्ये सामान्य आहेत आणि दोन्ही पूरक आहार आणि रक्त संक्रमणाने व्यवस्थापित करण्यात आले. ७८ दिवस सतत बाल अतिदक्षता विभागातील उपचारानंतर, बाळाने स्तनपान स्विकारल्यानंतर तसेच वयानुसार विकासात्मक टप्प्या गाठल्यावर त्याला घरी सोडण्यात आले. नोव्हेंबर २०२५ मधील फॉलो-अपमध्ये बाळाचे वजन २.५६ इतके वाढले. आमचे बाळ अकाली जन्माला आले, जेव्हा आम्ही त्याला पहिल्यांदा पाहिले तेव्हा त्याची प्रकृती आम्हाला चिंता वाटू लागली. मदरहूड हॉस्पिटलच्या टीमने आम्हाला आधार दिला व आमच्या बाळाची पुरेपुर काळजी घेतली. आमच्या बाळाला नवे आयुष्य दिल्याबद्दल आम्ही मदरहूड हॉस्पिटल व त्यांच्या टिमचे मनापासून आभार मानतो.

## प. मनपा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि काँग्रेस पक्ष सत्तेवर येईल, पक्ष २०२५-२६ काँग्रेसचा नारा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने 'लक्ष्य 2025-26' जनसंवाद कार्यशाळेचे आयोजन कळंबोली येथील न्यू सुधागड हायस्कूलमध्ये करण्यात आले होते. कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री व ज्येष्ठ काँग्रेस नेते नितीन राऊत उपस्थित होते. कुणाल राऊत,यशपाल भिंगे, गोपाल तिवारी,हनुमंत पवार,ऋषिकेश पाटील, प्रनित जांभुळे,आर.सी घरत,जीशान सय्याद,वर्षा शिक,हरेश केणी,श्रुती म्हात्रे,चंद्रकला नायडू, शशिकला सिह,निर्मला म्हात्रे,हेमराज म्हात्रे,लतीफ शेख,विश्वनाथ




चौधरी,जयेश लोखंडे, नौफील सय्याद,यांसह महाराष्ट्र काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ नेते पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील,युवा कार्यकर्ते प्रितेश साहू यांनी केलेल्या विशेष आयोजित या कार्यशाळेत निवडणूक प्रक्रिया,मतदार यादी वाचन, बुथ लेवल प्रशिक्षण,सोशल मीडियाचा प्रभावी वापर, ईव्हीएम ट्रेनिंग आणि जनसंवाद याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.काँग्रेस ही काळाची गरज असून,सुदाम पाटील,प्रितेश शाहू यांच्या कार्याप्रणालीवर विश्वास ठेवत परिसरातील अनेक महिलांनी व नागरिकांनी कार्यक्रमादरम्यान काँग्रेसचा झेंडा हाती घेतला.

येत्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये प्रभावी रणनीती,वोट चोरीचे प्रकार, स्थानिक प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना यावरही चर्चा झाली. सत्ताधारी पक्षावर जोरदार टीकेची झोड उठवली.

आगामी महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडी आणि काँग्रेस पक्ष सत्तेवर येईल,असा ठाम विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

## धानोरा केंद्राच्या वतीने राष्ट्रीय खेळाडू श्री बाळासाहेब शेंदूरकर यांचा सत्कार संपन्न

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये आष्टी तालुक्याचे राष्ट्रीय खेळाडू श्री. बाळासाहेब शेंदूरकर सर यांनी पुन्हा एकदा आपले खेळाडूवृत्तीचे वर्चस्व सिद्ध केले आहे.गोळाफेक या प्रकारात त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत आष्टी तालुक्यातून विभागीय स्पर्धेसाठी निवड मिळवली असून तालुक्याचे नाव मानाने उंचावले आहे.शेंदूरकर सरांची खेळातील वाटचाल ही अत्यंत प्रेरणादायी आहे. १९९६-९७ सालापासून त्यांनी जिल्हा परिषद कर्मचारी मराठवाडा विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये सलग चमकदार कामगिरी करत १००, २०० आणि ४०० मीटर धावण्याच्या तिन्ही स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यांच्या या अप्रतिम प्रदर्शनामुळे बीड जिल्ह्याला छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय जनरल चॅम्पियनशिप जिंकण्याचा मान मिळाला होता.इतक्या वर्षांनंतरही त्यांनी आपली ॲथलेटिक्समधील निष्ठा, जिद्द आणि कौशल्य प्रामाणिकपणे सांभाळले आहे. आजही मैदानावर तेवढ्याच जोमाने, शिस्तीने आणि आत्मविश्वासाने उतरत असल्याचे दृश्य युवा पिढीसाठी आदर्श ठरणारे आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल तालुक्याच्या गट शिक्षणाधिकारी सौ सीमा काळे मॅडम धानोरा केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री. सुनील तरटे सर, केंद्रप्रमुख श्री. जावेद पठाण साहेब, क्रीडा मार्गदर्शक श्री. जुनेद साहेब, पतसंस्थेचे सचिव श्री. विलास मोरे सर, शिक्षक नेते श्री. बाळासाहेब महाडिक सर, श्री. रमेश भापकर सर, श्री. आमले सर, श्री. रामदास काळे सर, श्री. पोपटराव काळे सर, श्री. असलम



शेख सर, सतीश एकशिंगे, अतुल चव्हाण, संतोष आटोळे तसेच केंद्रातील सर्व मान्यवर शिक्षकांनी शेंदूरकर सरांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय असून त्यांचा प्रवास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.आगामी विभागीय स्पर्धेसाठी श्री. बाळासाहेब शेंदूरकर सरांना मनःपूर्वक शुभेच्छा!त्यांच्या कामगिरीतून आष्टी तालुका आणि धानोरा केंद्र यांचा गौरव निश्चितच वाढेल, अशी सर्वांची खात्री आहे

# अर्धापूर तालुक्यात तरुणीची निर्घृण हत्या

## बलात्कारासह अनेक गंभीर कलमांखाली आरोपीवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी**

**अर्धापूर :** अर्धापूर तालुक्यातील एका बौद्ध तरुणीच्या मृत्यू प्रकरणाने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. नातेवाईकांच्या तक्रारीनुसार, शीतल मोरे हिला आरोपी महादेव सोनाजी काळे याने प्रेमसंबंधाचा गैरवापर करून नांदेडच्या पांगरा झरी परिसरातील आपल्या खोलीत बोलावून घेतले. तेथे तिच्यावर मारहाण करून बलात्कार करण्यात आला व नंतर हत्या करून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने तिला फासावर लटकवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप**

घटनेनंतर नातेवाईकांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेतली असता, पोलिसांनी 24 तास उलटूनही तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला.



या निष्क्रियतेमुळे संताप व्यक्त करत नातेवाईकांसोबत स्थानिक नागरिकांनीही पोलिसांकडे कठोर कारवाईची मागणी केली.

**वंचित बहुजन आघाडीचा पोलिस ठाण्यात ठिय्या**

ही माहिती वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मिळताच ते तात्काळ ग्रामीण पोलिस स्टेशनमध्ये दाखल झाले. तक्रार स्वीकारून आरोपीवर तातडीने गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांकडे केली. मात्र तरीही पोलिस प्रक्रिया उशिरा घेत असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

**ॲड. बाळासाहेब आंबेडकरांचा हस्तक्षेप**

प्रकरण गंभीर होत असल्याचे कळताच ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी थेट जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांच्याशी संपर्क साधून आरोपीवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी म्हणून औरंगाबाद घाटी रुग्णालयात इन-कॅमेरा शवविच्छेदन करण्यास सांगितले.

**रात्री उशिरापर्यंत वंचित कार्यकर्त्यांची उपस्थिती**

जिल्हा अध्यक्ष उत्तर राजेश्वर हत्तिअंबिरे पालमकर, राज्य सदस्य अक्षय बनसोडे, जिल्हा महासचिव वैभव लष्करे, शहर उपाध्यक्ष पंकज हाटकर, मनीष हाटकर, सुमित सावळे, नवीन थोरात यांच्यासह मोठ्या संख्येने वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते आणि मयत तरुणीचे नातेवाईक पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत उपस्थित होते.

**आरोपीवर अनेक गंभीर कलमांतर्गत गुन्हा दाखल**

आखेर वंचित बहुजन आघाडीच्या हस्तक्षेपानंतर पोलिसांनी नातेवाईकांची तक्रार स्वीकारली आणि आरोपी महादेव सोनाजी काळे याच्याविरोधात खालील गंभीर कलमांनुसार गुन्हा नोंदवला:

302 — खून
376(2)(n) — वारंवार बलात्कार
376(2)(m) — बलात्कार करून खून
354, 354-B — स्त्रीवर अत्याचार
392/394 — चोरी, लूट
201 — पुरावे नष्ट करणे
120-B — कट रचणे
417/420 — फसवणूक, प्रेमसंबंधाचा गैरवापर
SC/ST अत्याचार प्रतिबंधक कायदा

या घटनेने परिसरात तीव्र संतापाची लाट पसरली असून पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## सहकार क्षेत्रात दत्ताराम चाळके यांचे मोठे योगदान -रिझर्व्ह बँक संचालक सतिश मराठे



**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** ग्रामीण भागातील बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि व्यवसाय विस्तारासाठी दत्ताराम चाळके सहकाराच्या माध्यमातून प्रचंड काम केले आहे. गेल्या २० वर्षापासून त्यांच्या कार्याचा मी साक्षीदार आहे. अनेक संस्था स्थापनेत आणि आर्थिक शिस्तीमध्ये त्यांनी निर्णायक योगदान दिले आहे. कोणत्याही गटाशी, पक्षाशी, जातीशी जोडले गेले नसून सहकार क्षेत्रात अनेक संस्थांना एकत्र घेऊन काम करणारे नेतृत्व आहे. अशा शब्दात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे तसेच नाबार्डचे संचालक सतिश मराठे यांनी अपना बँकेचे अध्यक्ष दत्ताराम चाळके यांचा गौरव केला. चाळके यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त या सोहळ्याला अपना बाजारचे अध्यक्ष अनिल गंगर, कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे, ठाणे जनता बँकेचे अध्यक्ष शरद गांगल, मुंबई मराठी पत्रकार संघाचे संदिप चव्हाण, सहकार भारतीचे महामंत्री विवेक जुगादे, महाराष्ट्र अर्बन बँक्स फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, बृहन्मुंबई को. ऑप. बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष गुलाबराव जगताप, रत्नागिरी येथील नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये, गोव्यातील उद्योगपती प्रितेश देसाई, को. ऑप. बँक्स एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस नरेंद्रकुमार सावंत, डॉ. रामकृष्ण कोळवणकर आदि मान्यवर उपस्थित होते.

## सह्याद्री कुणबी संघ पुणे कोथरुड विभागाच्या वतीने डेक्कन संभाजी महाराज स्मारक येथे भव्य दिपोत्सव साजरा




**दैनिक युवक आधार**

**पुणे:-(प्रमोद तरळ) :** दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी "सह्याद्री कुणबी संघ पुणे- कोथरूड विभाग" च्या वतीने डेक्कन छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथे रांगोळी काढून हजारो पणत्या प्रज्वलित करून "भव्य दीपोत्सव" साजरा करण्यात आला. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून "महाआरती" करण्यात आली. यावेळी सह्याद्री कुणबी संघ कोथरूड विभागाचे पालक प्रतिनिधी श्री. प्रविण भाऊ भोज व विभाग अध्यक्ष श्री. अविनाश शिंदे यांनी उपस्थित मान्यवर पाहुणे व पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. दीपोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोथरूड विभागातील सर्व सदस्यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सह्याद्री कोथरूड विभागाचे सरचिटणीस श्री. विराज डाकवे यांनी केले.

# उमरी नगर परीषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ नगरअध्यक्ष पदासाठी ४ तर नगरसेवक पदासाठी ६२ अर्ज पात्र

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर :** उमरी नगर परीषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी नामनिर्देशन पत्रांची छाननी निवडणूक निर्णय अधिकारी सौ.मंजुषा भगत, मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर यांच्या उपस्थितीत हुतात्मा दत्तात्रय उत्तरवार सभागृह तहसिल कार्यालय येथे दिनांक१८/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता छाननीस सुरुवात झाली यामध्ये नगरअध्यक्ष पदाचे उमेदवार पुढील प्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुदिराज शकुंतला भगवान, काँग्रेस रेणेवाड श्रध्दा ईश्वर, शिवसेना (शिंदे गट) गोटमवाड चंद्राबाई गणपत, भाजपा माचेवाड स्वप्ना श्रीराम,तर नगरसेवक पदासाठी प्रभाग क्र.01 (अ) झडते सुनंदा शेषराव, लांडगे मंगल गंगाधर, वाघमारे लक्ष्मीबाई अरविंदप्रभाग क्र.01 (ब) भुसांडे संजय कैलासराव, अचकुलवार विशाल विनोद, चंदनवार संदिप दिलीप ,प्रभाग क्र.02 (अ) वाघमारे संतोष रामराव, गोवंदे संदिप पुंडलिक, कंधार रतन बाबुराव, प्रभाग क्र.02 (ब) खुरेशी सलमा बेगम वशीम, सय्यद नाजमीन इलियास, पठाण नाजीया बेगम रईस,शेख मालनबी छोटुमियाँ, प्रभाग क्र.03 (अ) खांडरे अनुराधा गजानन, अनंतवार अनिता श्रीनिवास, प्रभाग क्र.03 (ब) दवणे माया बालाजी, हेमके शिवाजी बाळोजी, सोनकांबळे कैलास संतराम, जमदाडे साईनाथ हिरामण, प्रभाग क्र.04 (अ) दुधंबे भारतीबाई किशन, सुर्यवंशी बालाजी शंकर, कटकदवने अनुसयाबाई विश्वनाथ, सवई भिमराव गंगाधर , प्रभाग क्र.04 (ब) शेख शमीम सजन, बेग नसिम बेगम बेग रियाझ, आडगुडवाड प्रियंका गजानन, प्रभाग क्र.05 (अ) बुंदेलकर प्रताप गंगाराम, अलसटवार गजानन सुरेश , प्रभाग क्र.05 (ब) नगनुरवार जयश्री अनिल , कुलकर्णी सायली संजय , प्रभाग क्र.06 (अ) रणनवरे प्रिती विकेंद्र , जोंधळे विजयमाला प्रशांत प्रभाग क्र.06 (ब) देशमुख कैलास श्रीनिवासराव , देशमुख विश्वजित विक्रम , आडगुडवाड गजानन माधव ,प्रभाग क्र.07 (अ) दांडेवाड मिराबाई बाबु , रॅपनवाड सुमनबाई किशनराव, प्रभाग क्र.07 (ब) कावळे गणपती वैजनाथ ,पबितवार किशोर विठ्ठलराव ,उमाटे सुर्यकांत लक्ष्मण , पंडित विष्णुकुमार नंदकिशोर ,प्रभाग क्र.08 (अ) पेरेवार अश्विनी सुभाष , खांडरे रुक्मिनीबाई शंकर , प्रभाग क्र.08 (ब) लोध कांचन जगदिश , येताळे गणेशराव किशनराव ,जाधव राजेश शिवराम , गोरठेकर पांडूरंग बाबासाहेब , प्रभाग क्र.09 (अ) पुपुलवाड रोहित दतात्रय , निकिता कबीरराव सिंगनवाड , गुंडेवाड मिनाजी मारोतराव प्रभाग क्र.09 (ब) लक्ष्मीबाई विठ्ठल शिंदे, चित्राबाई अशोक मालीपाटील,सैदमवार ज्योती आकाश , गोटमवाड पुजा माधव , प्रभाग क्र.10 (अ) शेळके मिराबाई ईरबा , सोनकांबळे संध्या अनिल, सवई नागमणी किरण, सवई सुनिता वसंत , प्रभाग क्र.10 (ब ) शेख बाबुबेग हुसेन बेग , पडोळे आशा महेश ,सोनकांबळे अनिल संतराम , अ.समद अ.लतीफ असे एकूण नगरअध्यक्ष पदासाठी ४ तर नगरसेवक पदासाठी ६२ उमेदवारी अर्ज पात्र असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी सौ.मंजुषा भगत, मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर यांनी माहिती दिली..